७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

रविवार, दि. १९ एप्रिल २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ११४ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये


# काँग्रेसने स्वप्नांचा चक्काचूर केला : पंतप्रधान

## महिला सगळं विसरतात परंतु त्यांचा अपमान कधीच विसरत नाहीत : नरेंद्र मोदींचा हल्लाबोल

**मुंबई (दै. संध्या)**



काँग्रेस आणि त्यांच्या सोबतच्या पक्षांनी नारीशक्ती वंदन विधेयकाला विरोध करत महिलांच्या अधिकारांचे भ्रूणहत्या केली. ज्या ज्या पक्षांनी महिलांच्या आरक्षणामध्ये अडथळे आणले त्यांना भविष्यात परिणाम भोगावे लागतील, असा इशारा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिला. या पक्षांनी महिला आरक्षणाला विरोध करत त्यांचा खरा चेहरा समोर आणला असंही नरेंद्र मोदी म्हणाले. महिला आरक्षण आणि मतदारसंघ पुनर्रचना संबंधित 131 वे घटनादुरुस्ती विधेयक संसदेत नामंजूर झाल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना संबोधित करत आपली भूमिका मांडली. काँग्रेसने इतिहास रचण्याची आणि महिलांच्या बाजूने उभे राहण्याची संधी गमावली असं नरेंद्र मोदी म्हणाले. नरेंद्र मोदी म्हणाले की, "आज भलेही हे विधेयक पास करण्यासाठी 60 टक्के बहुमत आमच्याकडे नसेल, परंतु देशातील कोट्यवधी महिलांची आम्हाला साथ आहे. महिलांच्या अधिकारांमध्ये येणाऱ्या प्रत्येक अडचणी आम्ही दूर करू. आमचा विश्वास दृढ आहे. आम्ही फक्त त्या वेळेची वाट पाहतोय. काल आमच्याकडे संख्याबळ नाही म्हणजे आमचा पराभव झाला असं नाही. आमचा प्रयत्न थांबणार नाही. आमच्याकडे पुढे अनेक संधी येतील आणि आम्ही हा संकल्प पूर्ण करूच."

भारतीय महिलांच्या इच्छांना रोखण्यात आलं, त्यांच्या स्वप्नांचा चक्काचूर करण्यात आला. आमच्यासाठी देशहित सर्वात प्रथम आहे. पण काही लोकांसाठी पक्षहित हे सर्वात मोठं होतं. त्यावेळी देशातील महिलांना त्याचे परिणाम भोगावे लागतात. यावेळीही असंच काहीतरी झालं. काँग्रेस, समाजवादी, डीएमके यांच्यामुळेही आता असंच घडलं. देशातील कोट्यवधी महिला संसदेकडे डोळे लावून बसल्या होत्या. ज्यावेळी महिलांच्या हितासंबंधी संसदेत प्रश्न उपस्थित झाला आणि त्यांच्या अधिकारांवर गदा आली त्यावेळी काँग्रेस सारख्या परिवारवादी पक्ष टाळ्या वाजवत होते. ज्यावेळी महिलांच्या अधिकारांवर गदा येते त्यावेळी त्याचा बदला घेतला जाईल. नारीशक्ती वंदन विधेयकाला ज्या लोकांनी विरोध केला, त्यांनी महिलांना गृहीत धरण्याची चूक केली. देशातील महिलांना विरोधकांची भूमिका समजली आहे. त्याचा परिणाम आता भोगावा लागणार आहे. नारीशक्ती वंदन बिल हे प्रत्येकाला काहीतरी देणारं होतं, कुणाचेही काहीही काढून घेणारं नव्हतं. गेल्या 40 वर्षांपासून प्रलिंबित असलेलं ते बिल होतं. या माध्यमातून एकविसाव्या शतकातील महिलांना नवीन संधी देणारे आणि त्यांच्या वाटेतील अडचणी दूर करणारे होते. देशातील अर्ध्या लोकसंख्येला त्यांचा अधिकार देणारा तो प्रयत्न होता.

मतदारसंघ पुनर्रचनेवर काँग्रेस आणि टीएमसी, डीएमके, समाजवादी पक्षाने सातत्याने अफवा पसरवल्या. या विधेयकाच्या माध्यमातून सर्व राज्यांच्या संसदेतील प्रतिनिधित्वामध्ये समान वाढ होणार होती. परंतु, विरोधकांच्या विरोधामुळे हे होऊ शकलं नाही.

### मतदारसंघ पुनर्रचनेमुळे महिलांची संख्या वाढणार होती

मतदारसंघ पुनर्रचना विधेयकामुळे महिलांच्या वाट्याला येणाऱ्या मतदारसंघांमध्ये मोठी वाढ होणार होती. परंतु काँग्रेसला ते नको असल्याने त्याला विरोध केला. काँग्रेसने 'फोडा आणि राज्य करा' हे सूत्र इंग्रजांपासून घेतलं आणि त्याचाच वापर त्यांनी यावेळी केला.

# महाराष्ट्रात पुन्हा पावसाचे संकट !

## २० ते २२ एप्रिल दरम्यान गारपीटीचा अंदाज

**मुंबई (दै. संध्या)**

महाराष्ट्रात अनेक भागांमध्ये मागील काही आठवड्यात अवकाळी पावसाचा जोरदार फटका बसला. यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठे नुकसान देखील झाले. त्यानंतर पुन्हा कडक उन तसेच गर्मीत वाढ झाल्याचे पाहायला मिळाले. उन इतके वाढले की अकोल्यात उष्माघातामुळे एका रिक्षा चलकाचा मृत्यू झाल्याची देखील माहिती समोर आली होती. मात्र, आता पुन्हा राज्यात काही ठिकाणी वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली असून, यासंदर्भात मुख्यमंत्री कार्यालयाकडून माहिती देण्यात आली आहे.

मुख्यमंत्री कार्यालयाने ट्विट करत माहिती दिली की, राज्यातील विविध भागांमध्ये पुढील काही दिवसांत हवामानात बदल होण्याचे संकेत मिळत असून 20 ते 22 एप्रिलदरम्यान वादळी पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. पश्चिम महाराष्ट्रातील घाट परिसर, खानदेश, मराठवाडा तसेच विदर्भातील काही भागांमध्ये दुपारनंतर आभाळ दाटून येत मेघगर्जनेसह पाऊस होऊ शकतो. या काळात विजांचा कडकडाट, सोसाट्याचा वारा आणि काही ठिकाणी गारपीट होण्याचीही शक्यता वर्तवण्यात आली आहे.

हवामान खात्याच्या अंदाजानुसार 19 एप्रिल रोजी पश्चिम महाराष्ट्रातील घाट क्षेत्र, उत्तर खानदेश आणि दक्षिण मराठवाड्यात दुपारनंतर वादळी पावसाची स्थिती निर्माण होऊ शकते. त्यानंतर 20 आणि 21 एप्रिल रोजी या पावसाचा प्रभाव अधिक भागांमध्ये जाणवण्याची शक्यता असून पुणे विभागासह मराठवाड्यातील दक्षिण भाग, छत्रपती संभाजीनगर विभाग आणि विदर्भातील अमरावती परिसरातही वादळी पावसाची शक्यता आहे. मात्र 22 एप्रिल रोजी या पावसाच्या क्षेत्रात आणि तीव्रतेत काहीशी घट होईल, असे संकेत आहेत.

तसेच कृषी विभागाने शेतकऱ्यांना आवाहन केले आहे की, काढणी केलेली पिके सुरक्षित ठेवावीत, शेतीची कामे हवामानानुसार नियोजित करावीत आणि वादळी वारे व गारपीटीपासून पिकांचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.


क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा

SUBSCRIBE

www.sandhyaepaper.com


**ढिंग-टांग**




# पोलिसांच्या हलगर्जीपणामुळे शीतल तेजवानीला जामीन

**पुणे (दै. संध्या)**



पुण्यातील मुंढवा जमीन गैरव्यवहार प्रकरणात अटकेत असलेल्या शीतल तेजवानीला मोठा दिलासा मिळाला आहे. उच्च न्यायालयाने तिची अटक आणि रिमांड प्रक्रियेत गंभीर त्रुटी आढळल्याचे नमूद करत जामीन मंजूर केला आहे. विशेष म्हणजे, बावधन पोलिसांच्या कामकाजातील हलगर्जीपणाचा फायदा तेजवानीला झाल्याची चर्चा सध्या जोर धरत आहे. या निर्णयामुळे पोलिसांच्या तपास पद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मुंढवा जमीन गैरव्यवहार प्रकरणात पोलिसांनी अटकेपूर्वी आवश्यक प्रक्रिया पूर्ण करताना अनेक चुका केल्याचे समोर आले आहे. पुणे पोलिसांनी ताब्यात घेताना अटकेचे स्पष्ट कारण दिले नाही, तसेच पिंपरी येथील सेवा विकास बँक प्रकरणात अटकेपूर्वी दोन तास आधी माहिती देण्याचा नियमही पाळला गेला नाही. या त्रुटींवर न्यायालयाने ताशेरे ओढत पोलिसांच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त केली. यामुळे अटक आणि त्यानंतरचे सर्व रिमांड आदेश बेकायदेशीर ठरवण्यात आले.

न्यायालयाच्या आदेशानुसार, 16 डिसेंबर 2025 रोजी बावधन पोलीस ठाण्यातील CR No. 523/2025 अंतर्गत झालेली अटक आणि त्यानंतरचे रिमांड आदेश अवैध घोषित करण्यात आले. याचबरोबर पुढील सर्व ताबा आदेशही रद्द करण्यात आले आहेत. त्यामुळे शीतल तेजवानीला तत्काळ मुक्त करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मात्र, यासाठी 50,000 रुपयांचा वैयक्तिक जामीन (PR bond) आणि तितक्याच रकमेचे जामीनदार सादर करावे लागणार आहेत.

या जामिनासोबत न्यायालयाने काही कठोर अटीही घातल्या आहेत. आरोपीने कोणत्याही पुराव्याशी छेडछाड करायची नाही, साक्षीदारांना धमकी किंवा प्रलोभन द्यायचे नाही, तसेच तपास अधिकाऱ्यासमोर गरजेनुसार हजर राहणे बंधनकारक आहे. याशिवाय, न्यायालयात नियमित हजेरी लावण्याचेही आदेश देण्यात आले आहेत. या अटींचे उल्लंघन झाल्यास जामीन रद्द होऊ शकतो, असा इशाराही न्यायालयाने दिला आहे.

# राहुल गांधींवरील FIRचा स्वतःचाच आदेश जजनी बदलला

**अलाहाबाद (दै. संध्या)**



अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या लखनऊ खंडपीठाने खासदार राहुल गांधींविरोधात एफआयआर नोंदवण्याच्या स्वतःच्याच आदेशाला स्थगिती दिली आहे. हे प्रकरण दुहेरी नागरिकत्वाशी संबंधित आहे. न्यायालयाने शनिवारी आपल्या वेबसाइटवर जारी केलेल्या आदेशात ही माहिती दिली.

न्यायालयाने सांगितले की, शुक्रवारी (17 एप्रिल) सुनावणी झाली होती. यामध्ये याचिकाकर्त्यासह केंद्र आणि राज्य सरकारच्या वकिलांना विचारण्यात आले होते की, राहुल गांधींना नोटीस बजावण्याची गरज आहे का? वकिलांनी नोटीस बजावण्याची कोणतीही गरज नसल्याचे सांगितले होते. त्यानंतर एफआयआर नोंदवण्याचा आदेश पारित करण्यात आला होता.

मात्र, आदेश टाइप होण्यापूर्वी न्यायमूर्ती सुभाष विद्यार्थी यांनी पुन्हा निर्णयाची तपासणी केली. त्यांना आढळले की, अलाहाबाद उच्च न्यायालयाने 2014 मध्ये एका निर्णयात म्हटले होते की, एफआयआर नोंदवण्याची मागणी करणाऱ्या याचिका फेटाळल्यास पुनरीक्षण याचिकाच पोषणीय असते. अशा प्रकरणांमध्ये प्रस्तावित आरोपीला नोटीस पाठवणे आवश्यक आहे.

हे लक्षात घेऊन न्यायालयाने म्हटले की, राहुल गांधींना नोटीस बजावल्याशिवाय निर्णय देणे योग्य नाही. न्यायालयाने या प्रकरणाच्या पुढील सुनावणीसाठी 20 एप्रिल ही तारीख निश्चित केली आहे.

ही याचिका कर्नाटकमध्ये राहणारे एस. विग्नेश शिशिर यांनी दाखल केले होते. त्यांनी राहुल गांधींवर भारतीय न्याय संहिता, अधिकृत गोपनीयता अधिनियम, परदेशी अधिनियम आणि पासपोर्ट अधिनियम अंतर्गत गंभीर आरोप केले आहेत. दरम्यान, न्यायालयाचा निर्णय आल्यानंतर याचिकाकर्ते विग्नेश शिशिर म्हणाले- राहुल गांधींविरोधात एफआयआर (FIR) दाखल करण्याचा निर्णय मागे घेण्याची तक्रार आम्ही CJI कडे करू. अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या लखनऊ खंडपीठाने शुक्रवारी राहुल गांधींविरोधात एफआयआर (FIR) दाखल करण्याचे आदेश दिले होते. न्यायमूर्ती सुभाष विद्यार्थी म्हणाले होते की, एफआयआर (FIR) दाखल करून प्रकरण सीबीआयकडे (CBI) हस्तांतरित केले जावे. मात्र, त्यापूर्वी 28 जानेवारी 2026 रोजी खासदार-आमदार न्यायालयाने विग्नेश शिशिर यांची याचिका फेटाळून लावली होती.

तेव्हा न्यायालयाने म्हटले होते की, या प्रकरणात उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाकडून अद्याप कोणताही आदेश पारित झालेला नाही. याचिकाकर्त्याकडून नागरिकत्वाच्या (सिटीझनशिप) संदर्भात कोणताही नवीन किंवा ठोस पुरावा सादर करण्यात आलेला नाही.

उच्च न्यायालयाने कनिष्ठ न्यायालयाचा आदेश रद्द करताना म्हटले होते की, दंडाधिकाऱ्यांनी लावलेल्या आरोपांच्या सत्यतेवर टिप्पणी करण्याची आवश्यकता नव्हती. सुनावणीदरम्यान, न्यायाधीश सुभाष विद्यार्थी यांनी गृह मंत्रालयाच्या परदेशी विभागाला निर्देश दिले होते की, प्रकरणाशी संबंधित सर्व आवश्यक कागदपत्रे सादर करावीत. मंत्रालयाने प्रकरणाशी संबंधित सर्व फाइल्स उच्च न्यायालयात सादर केल्या होत्या.

विग्नेश शिशिर यांचा दावा आहे की त्यांनी न्यायालयात कागदपत्रे आणि पुरावे सादर केले. यावरून असे सूचित होते की राहुल गांधी युनायटेड किंगडममध्ये मतदार होते. तेथे निवडणुकांमध्ये सहभागाशी संबंधित नोंदी उपलब्ध आहेत.

**ब्रेकिंग न्यूज**

## किरकोळ कारणावरून आत्महत्या

यवतमाळ (दै. संध्या) : आर्णी तालुक्यातील बोरगाव येथे एका गृहिणीने किरकोळ कारणावरून आलेल्या रागातून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. 'मटण नीट शिजले नाही' या शुल्लक कारणावरून पतीशी झालेल्या वादाने चेतना मनोज जाधव या महिलेने विष प्राशन करून आपले जीवन संपवले. एका हसत्याखेळत्या संसाराची या घटनेमुळे राखरांगोळी झाली असून, संतापाच्या भरात घेतलेल्या एका निर्णयामुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. घटनेच्या दिवशी पती मनोज जाधव याने एका मित्राला जेवणासाठी घरी बोलावले होते. मटण व्यवस्थित शिजले नसल्याचे कारण पुढे करत मनोजने पाहुण्यासमोरच चेतनाचा अपमान करण्यास सुरुवात केली. हा वाद केवळ स्वयंपाकापुरता मर्यादित न राहता, त्यात मनोजचा संशयी स्वभाव आणि व्यसनाचीही भर पडली. या सार्वजनिक अपमान आणि सततच्या जाचाला कंटाळून चेतनाने टोकाचे पाऊल उचलले. घटनेच्या दिवशी पाहुण्यांसमोरच झालेल्या अपमानामुळे चेतना भरल्या ताटावरून उठून आत गेली आणि तिने विषारी औषध प्राशन केले. बाहेर येऊन तिने ही बाब आपल्या पतीला सांगितली तेव्हा एकच खळबळ उडाली.

**दै. संध्या अँकर** कंपन्यांना त्वरित जागा देण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश

# डेटा सेंटर गुंतवणुकीला वेग



**मुंबई (दै. संध्या)**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात डेटा सेंटर क्षेत्राला गती देण्यासाठी महत्त्वाचे निर्देश दिले आहेत. मध्य आशियातील अनेक नामांकित कंपन्या महाराष्ट्रात गुंतवणुकीसाठी उत्सुक असल्याच्या पार्श्वभूमीवर, संबंधित कंपन्यांना करारानंतर त्वरित जागा उपलब्ध करून द्यावी, असे त्यांनी स्पष्ट केले. सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे झालेल्या बैठकीत डेटा सेंटर प्रकल्पांबाबत सविस्तर सादरीकरण करण्यात आले. या बैठकीत उद्योगमंत्री उदय सामंत हे व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे सहभागी झाले होते.

मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, डेटा सेंटर क्षेत्रातील प्रकल्पांसाठी आवश्यक सर्व प्रक्रिया ठराविक कालमर्यादेत पूर्ण करण्यात याव्यात. विशेषतः जमीन उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया जलदगतीने पूर्ण करण्यावर भर देण्यात आला. डेटा सेंटर प्रकल्पांसाठी अखंड वीजपुरवठा अत्यावश्यक असल्याने संबंधित कंपन्यांना प्राधान्याने वीज उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले. ऊर्जा विभागाने यासाठी आवश्यक ती दक्षता घ्यावी, असेही सांगण्यात आले.

CIDCO मार्फत डेटा सेंटरसाठी लॅण्ड बँक विकसित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच सब-स्टेशनसाठी जागा त्वरित उपलब्ध करून देण्यावरही भर देण्यात आला. सिडकोकडून डेटा सेंटरसाठी आवश्यक पायाभूत सुविधा उभारण्याचे काम सुरू असल्याची माहिती देण्यात आली. तसेच ऊर्जा विभागाकडून पुरेशा विजेची उपलब्धता सुनिश्चित केली जात असल्याचेही स्पष्ट करण्यात आले.

### आवश्यक वीजनिर्मिती व सुरळीत वीजपुरवठ्यासाठी यंत्रणा सज्ज


रुफटॉप सौर ऊर्जेमुळे फायदा होत आहे. वीज निर्मितीसाठी पुरेसा कोळसा व पाण्याची उपलब्धताही आहे. वीजनिर्मिती व पुरवठा सुरळीत रहावा यासाठी सर्व आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. यासंदर्भात मॉन्सूनपूर्व देखभाल दुरुस्तीची कामेही करण्यात येत आहेत. आपत्कालीन परिस्थितीवर मात करण्यासाठी यंत्रणा सज्ज असल्याची माहिती यावेळी ऊर्जा विभागामार्फत देण्यात आली.

### पुरेशा वीज खरेदीची व्यवस्था

- मुंबई आयलँडिंग योजना कार्यरत ही एक महत्त्वाची सुरक्षा यंत्रणा असून, ग्रीडमध्ये बिघाड झाल्यास मुंबईला स्वतंत्रपणे चालवण्याची क्षमता.
- मोठ्या प्रमाणातील वीज खंडित होण्यापासून संरक्षण
- भिरा पंप्ड स्टोरेज प्रकल्प कार्यरत
- सर्व ब्लॅक स्टार्ट ड्रिल्स यशस्वीरीत्या पूर्ण
- राज्य लोड डिस्पॅच केंद्र (SLDC) च्या बॅकअप कंट्रोल ड्रिल पूर्ण ज्यामुळे मुख्य नियंत्रण केंद्रात अडचण आल्यास कामकाज सुरळीत चालू राहू शकते.

# सासवड-वीर रस्त्यावर मद्यधुंद कारचालकाचा थरार

**सासवड (दै. संध्या)**



सासवड-वीर रस्त्यावरील काळुबाई मंदिराजवळ शनिवारी सकाळी एका मद्यधुंद कार चालकाने मृत्यूचे तांडव घडवले. दारूच्या नशेत भरधाव कार चालवत आरोपीने दोन दुचाकींना भीषण धडक दिली. या अपघातात पांगारे येथील दोन जणांचा जागीच अंत झाला, तर पिंपळे येथील पती-पत्नी गंभीर जखमी झाले आहेत. पोलिसां कडून मिळालेल्या माहितीनुसार, अक्षय सुहास परब (वय ३०, रा. अमनोरा हडपसर, पुणे) हा शनिवारी सकाळी ८ वाजेच्या सुमारास आपली कार (एम एच ४७ सी डी ७७०८) घेऊन वीर बाजूकडून सासवडकडे निघाला होता. काळुबाई मंदिराजवळील धोकादायक वळणावर, आरोपीने मद्यप्राशन केलेले असतानाही रस्त्याच्या स्थितीकडे पूर्णपणे दुर्लक्ष करून गाडी सुसाट चालवली. यावेळी त्याने समोरून येणाऱ्या दोन वेगवेगळ्या मोटारसायकलींना जोरदार धडक दिली.

या भीषण धडकेत एका दुचाकीवरील (एम एच १२ सी एफ २७८८) रवींद्र गोपाळ काकडे (वय ६५ वर्षे ) आणि महेंद्र संपत काकडे (वय ५३ वर्षे ) या दोन्ही शेतकऱ्यांचा जागीच मृत्यू झाला. गावच्या दोन प्रतिष्ठित व्यक्तींचा अशा अपघाती मृत्यूमुळे पांगारे गावावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. दुसऱ्या दुचाकीवरील (एम एच १२ एच क्यू १८०९) तुकाराम जयवंत पोमण (वय ६० वर्षे) आणि सुरेखा तुकाराम पोमण (वय ५० वर्षे) (रा. पिंपळे) हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अपघाताची भीषणता पाहून परिसरातील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. घटनेची माहिती मिळताच सासवड पोलिसांनी तातडीने धाव घेत आरोपी अक्षय परब याला ताब्यात घेतले. प्रकाश राजाराम काकडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १०५ (सदोष मनुष्यवध), २८१, १२५(ए), १२५(बी), ३२४(४) आणि मोटार वाहन कायद्याच्या कलम १८४, १८५ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. सासवड पोलीस ठाण्याचे अधिकारी या प्रकरणाचा अधिक तपास करत असून, मद्यधुंद अवस्थेत गाडी चालवून निष्पापांचा बळी घेणाऱ्या चालकावर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# संपादकीय

## ब्रिटनमध्ये आश्रयासाठी पाकिस्तानी...

पाकिस्तानी लोक काय काय करतील याचा खरंच काहीच भरवसा राहिलेला नाही. आश्चर्याची गोष्ट म्हणजे काही बाबतीत आता बांगलादेशानंही त्यांचा कित्ता गिरवायला सुरुवात केली आहे. खड्ड्यात चाललेल्या आपल्या देशात आता आपलं काहीच भवितव्य उरलं नसल्याचं काळल्यानं अनेक पाकिस्तानी नागरिक आपला देश सोडून दुसऱ्या देशात आश्रय घेत आहेत. त्यात अरब देशांसह ब्रिटनसारख्या देशाचाही समावेश आहे. व्हिसाची मुदत संपल्यावर कोणालाही त्या देशात राहता येत नाही आणि तो देश त्यांना सोडून परत आपल्या मायदेशी जावं लागतं, हा जगभराचा नियम आहे. पण इतर देशांमध्ये गेलेल्या अनेक पाकिस्तानी नागरिकांना तो देश सोडायचा नसतो आणि मायदेशीही परतायचं नसतं. पण त्यासाठी त्यांनी काय काय शक्कल लढवाव्यात? ब्रिटनसारखे काही उदार देश अशा नागरिकांना आपल्या देशात आश्रय देतात, ज्या लोकांना आपल्या मायदेशात धोका असतो. पाकिस्तान आणि बांगलादेश येथे समलैंगिक संबंध ठेवणं कायद्याने गुन्हा आहे. याच नियमाचा गैरफायदा घेऊन अनेक पाकिस्तानी आणि बांगलादेशी नागरिकांनी स्वत:ला समलैंगिक, गे असल्याचं भासवायला, तशी बनावट प्रमाणपत्रं मिळवायला सुरुवात केली आहे. आम्ही समलैंगिक असल्यानं आमच्या देशात आम्हाला धोका आहे असं सांगून त्यांनी ब्रिटनमध्ये 'आश्रय' मिळवायला सुरुवात केली आहे. यासाठी अनेक 'दलाल'ही तिथे तयार झाले आहेत. ते मोठी फी उकळून ब्रिटनमध्ये असलेल्या पाकिस्तानी आणि बांगलादेशी नागरिकांना 'गे' सर्टिफिकेट्स मिळवून देत आहेत. यासंदर्भातलं एक मोठं स्कॅण्डल नुकतंच उघडकीस आलं आहे. बीबीसीच्या अहवालानुसार, इमिग्रेशन सल्लागार हजारो पाउंड घेऊन खोटी कागदपत्रे त्यांना तयार करून देतात. ज्यांचा व्हिसा संपणार असेल, त्यांना बनावट कथा सांगितल्या जातात आणि खोटे पुरावे तयार करण्याचं प्रशिक्षणही दिलं जातं. विशेषत: ज्यांचे स्टुडंट, वर्क किंवा टुरिस्ट व्हिसा संपलेले असतात, अशा लोकांना त्यासाठी हेरलं जातं. आम्ही 'गे' आहोत, त्यामुळे आम्हाला ब्रिटनमध्ये राहू द्यावं अशी विनंती करणारे किती अर्ज ब्रिटनमध्ये दाखल होत असावेत? २०२५ मध्ये एकूण आश्रय अर्जांपैकी सुमारे ३५ टक्के अर्ज अशा प्रकारचे होते आणि त्यांची एकूण संख्या १ लाखाहून अधिक होती! ब्रिटनच्या गृह मंत्रालयाच्या अधिकृत आकडेवारीनुसार, २०२३ मध्ये लैंगिक



प्रवृत्तीच्या आधारावर आश्रय मागणाऱ्यांमध्ये पाकिस्तान पहिल्या क्रमांकावर होता, त्यानंतर बांगलादेशचा क्रमांक होता. हा घोटाळा आणि हे रॅकेट उघडकीस आल्यानंतर ब्रिटनच्या गृह मंत्रालयानं म्हटलं आहे, जो कोणी अशाप्रकारे ब्रिटनच्या उदारमतवादाचा गैरवापर आणि गैरफायदा घेताना आढळेल, त्याच्यावर कडक कायदेशीर कारवाई केली जाईल, ज्यात देशाबाहेर हकालपट्टीचाही समावेश आहे. पाकिस्तानी आणि बांगलादेशी नागरिकांनी ब्रिटनमध्ये आश्रयासाठी आणि बनावट दाव्यांसाठी मुख्यत: तीन गोष्टींचा आधार घेतला होता. त्यातल्या बहुतेकांनी लैंगिक ओळखीच्या आधारावर छळ, आमच्या विशिष्ट धार्मिक श्रद्धांमुळे आणि राजकीय विचारांमुळे धोका.. ही कारणं त्यासाठी नमूद केली होती. त्यामुळे पाकिस्तानातून येणाऱ्या नागरिकांना व्हिसा देणं तातडीनं थांबवा, अशी मागणी ब्रिटनमध्ये जोर धरू लागली आहे.

# गुरु वचन

## दु:खावर विजय मिळवा

सिद्धार्थ नावाचा राजकुमार होता. त्याला जीवनात काहीच कमी नव्हते. तो सुंदर, सुदृढ व सद्गृहस्थ होता. त्याला कुठलेही शारीरिक किंवा मानसिक कष्ट नव्हते. त्याच्यापुढे सुख–समृद्धी हात जोडून उभी होती. त्याची पत्नी यशोधरा ही सुंदर, सुदृढ व पतीव्रता होती. त्याचा मुलगा राहुल सुद्धा मनमोहक व सुदृढ होता. सर्व काही होऊनही सिद्धार्थ दु:खाच्या अनुभूतीने पिडीत राहत होता.

खरं म्हणजे जन्मानंतर माणूस कुठल्यातरी शारीरिक किंवा मानसिक दु:खाने पिडीत असतो. दु:खांना पाहून व अनुभवूनच सिद्धार्थ बुद्धात रूपांतरित झाले. अभावावाचे कारण आपण अभावासच दु:खाचे कारण मानतो. जगातील बहुतेक श्रीमंत लोक दु:खी व असमाधानी आहेत. एखादी वस्तु किंवा व्यक्तीचा अभावच त्यांना दु:खी करतो. काही लोकांकडे पैशांची कमी नाही पण ते शारीरिक दु:खाने पिडीत आहेत.

काही लोक काम, क्रोध, ईर्ष्या, द्वेष, मोह सारख्या मानसिक दु:खांनी ग्रस्त असतात. तसेच काही लोक अज्ञानामुळे दु:खी आहेत. जर काही लोकांना दु:ख नसेल तर त्यांच्यासाठी जन्म–मृत्यूचे दु:खच काय कमी आहे? विजय म्हणजे लक्ष्य.जगात सुखाचे काही क्षण असतात. याचे प्रमाण आपणास लोकांचे हसणे, बोलणे, गाणे, खेळण्यात व आनंद साजरा करण्यात मिळू शकते. काही लोक थट्टा–मस्करी करताना दिसतात पण हे सर्व सुख क्षणभंगुर व तात्पुरते आहे. हा सर्व खटाटोप दु:खातून वाट काढण्याचा उपक्रम आहे. जर दु:खास जीवनाचा एक भाग मानले तर आपण याचाच विचार करून आपण आपले बहुमूल्य जीवन नष्ट केले पाहिजे? नाही, आपले लक्ष्य दु:खांवर विजय मिळवणे आहे. हाच आमचा पुरुषार्थ आहे. जगास दु:खालय मानून तडफडत मरणे मानवाचा लज्जास्पद पराभव आहे. त्याने जगास परीक्षा–स्थळ मानत दु:ख–सागरास ओलांडण्याचा उपाय शोधला पाहिजे. यामुळे त्यास सुख व शांतता लाभेल. जिथे रोग आहेत, तिथे उपचार आहे, जिथे अडचणी आहेत, तिथे त्यातून निघण्याचा मार्ग उपलब्ध आहे. फक्त आपल्या हृदयात खरी जिज्ञासा असण्याची गरज आहे. तसेच आपल्या लक्ष्याप्रती निष्ठावान व साहसी बनावे. विचारवंत मानतात की, मानवाची विषय तृष्णाच सर्व दु:खांचे मूळ आहे. जर ते तृष्णाच्या मृग–मरीचिकात फसण्यात स्वत:ला वाचवू शकले तर निश्चितपणे त्यांना कुठलेच दु:ख असणार नाही.

आपणास समोर जे दिसते, मनात तेच मिळण्याची इच्छा असते. जे आपल्याकडे आहे, त्यापेक्षा जास्त मिळवण्याची इच्छा करणेच तृष्णा आहे, जी कधीच पुर्ण होत नाही. जे आपल्याकडे आहे, त्यात समाधान मानून जर जास्तीत जास्त मिळवण्याची अनावश्यक इच्छा सोडली तर सर्व दु:ख टाळले जाऊ शकतात.

जगातील सर्व वस्त नश्वर आहेत. जर व्यक्तीने ही गोष्ट मनात आत्मसात केली तर जगातील कुठलेच दु:ख त्यास विचलित करु शकत नाही. भगवान बुद्धांनुसार, दु:ख निवृत्तीतून निर्वाणीत आहे. स्वत:ला राग–द्वेषातून मुक्त करणेच निर्वाण आहे, ज्यास थोड्या प्रयत्नातून मनुष्य आपल्या जीवनातच मिळू शकते.

# उपदेशकथा

## विन्रम नेतृत्व

चंद्रावर पहिलं मानवी पाऊल ठेवणारा नील आर्मस्ट्राँग आपल्या सर्वांना माहीत आहे. त्याच्या या कर्तृत्वाबद्दल जगभरातून त्याचे अभिनंदन होत होते. एक अशक्यप्राय वाटणारी घटना सत्यात आल्याने त्या मोहिमेचा नेता नील आर्मस्ट्राँग खचितच कौतुकास पात्र होता. भारतातील डॉ. विक्रम साराभाई यांनी या यशास्विंतेबद्दल नील आर्मस्ट्राँगला विचारले 'इतकी मोठी सफलता तुम्ही कशी मिळवली?' नील आर्मस्ट्राँगने उत्तर दिले.' ही सफलता आमच्या अपोलो प्रोग्रॅमची आहे. आमच्या टीममधल्या प्रत्येकाला या मोहिमेचा उद्देश, कार्यपद्धती व अन्य बारीकसारीक तपशील माहीत होता. प्रत्येकाचे काम हे एका मोठ्या योजनेतील महत्वाचा दुवा आहे. याची जाणीव सर्वांना होती. माझ्या एका छोट्याशा चुकीमुळे संपूर्ण मोहीम अयशस्वी होईल हे सर्वांना समजले होते, म्हणून आमच्या अपोलो मोहिमेतील प्रत्येक घटकाने आपापले काम योग्य पद्धतीने केले आणि मोहीम यशस्वी झाली. सफलतेला साऱ्यांचे कष्ट कारणीभूत आहेत, मी तर केवळ निमित्तमात्र आहे. अभिनंदन सर्व चमूचे करायला हवे, माझ्या एकट्याने नव्हे!'

कथा उपदेश : विद्या हेच धन.

# पंचांग

| | |
|---|---|
| विक्रम संवत्– २०८२ | शुक्ल पक्ष |
| वैशाख शके | तिथि:द्वितीया १०:४९:३१ |
| संवत्– १९४८ | नक्षत्र:भरणी ०७:०९:४४ |
| संवत्सर – पराभवनाम | नक्षत्र:कृत्तिका |
| अयन– उत्तरायणारंभ | २८:३४:५९+ |
| मास– वैशाख | योग:आयुष्मान |
| ऋतु– सौर वसंत | २०:०१:३० |

# दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १२३

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 2 | 9 | 3 | | | |
| | 1 | 2 | 7 | | 6 | 9 | | |
| 5 | | 6 | 4 | | | | 3 | |
| 7 | | 5 | | | 9 | 4 | | |
| | 2 | | | 6 | | | 5 | |
| | | 3 | 5 | | | 6 | | 7 |
| | 7 | | | | 5 | 3 | | 1 |
| | | 8 | 6 | | 1 | 2 | 4 | |
| | | | 3 | 2 | 4 | | | |

## : सूडोकु :

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. १२२ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 2 | 3 | 5 | 6 | 1 | 7 | 9 | 4 |
| 5 | 4 | 7 | 2 | 8 | 9 | 3 | 1 | 6 |
| 9 | 1 | 6 | 3 | 7 | 4 | 5 | 8 | 2 |
| 3 | 8 | 5 | 4 | 1 | 6 | 9 | 2 | 7 |
| 2 | 6 | 1 | 9 | 3 | 7 | 8 | 4 | 5 |
| 4 | 7 | 9 | 8 | 5 | 2 | 1 | 6 | 3 |
| 6 | 3 | 2 | 1 | 9 | 5 | 4 | 7 | 8 |
| 7 | 9 | 8 | 6 | 4 | 3 | 2 | 5 | 1 |
| 1 | 5 | 4 | 7 | 2 | 8 | 6 | 3 | 9 |

# इतिहासात आजचा दिवस

## आंतरराष्ट्रीय

- १९०६ – पिएर क्यूरी या नोबेल पारितोषिकविजेत्या फ्रेंच पदार्थ वैज्ञानिकाला मोटरगाडीने उडविले. या अपघातात त्यांचे निधन झाले.
- २००८ – पाकिस्तानने जमिनीवरून जमिनीवर मारा करणाऱ्या लांब पल्ल्याच्या शाहीन–२ या क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी केली.

## राष्ट्रीय

- १९१० – देशभक्त क्रांतिकारक अनंत कान्हेरे, कृष्णाजी गोपाळ कर्वे आणि विनायक नारायण देशपांडे यांना ठाण्याचा जिल्हाधिकारी जॅक्सनची हत्या केल्याबद्दल ठाण्याच्या तुरुंगात फाशी देण्यात आली.
- १९७५ – भारतीय बनावटीचा पहिला उपग्रह 'आर्यभट्ट' रशियन अग्निबाणातून अवकाशात.
- २००३ – अटलबिहारी वाजपेयींनी पाकिस्तानपुढे शांततापूर्ण मैत्रीचा प्रस्ताव ठेवला.

## जन्म

- १८९२ – शिक्षणतज्ज्ञ आणि भारतातील पूर्वप्राथमिक शिक्षणाच्या प्रवर्तक ताराबाई मोडक यांचा जन्म.
- १९०५ – जेम्स ॲलन 'जिम' मॉलीसन या स्कॉटिश वैमानिकाचा जन्म.
- १९२५ – इतिहासाचे अभ्यासक डॉ. अ.रा. कुलकर्णी यांचा जन्म.
- १९२६ – सुप्रसिद्ध विज्ञान लेखक आणि भूशास्त्राचे प्राध्यापक प्रभाकर सोवनी यांचा जन्म.

## निधन

- १८८२ – चार्लस् रॉबर्ट डार्विन या उत्क्रांतिवादाच्या सहउद्गात्याचे निधन.
- १९८७ – ज्येष्ठ विचारवंत आणि पत्रकार पां.वा. गाडगीळ यांचे निधन.

# : SMS :

Wife: suniye, hum is hafte poora cinema dekhenge, agle hafte poora shopping karenge.
Husband: uske baad ke hafte poora mandir jaayenge
Wife: kyu?
Husband: bheek maangne ke liye

# हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३७.३ | २५.९ |
| अहमदनगर | ३६.२ | २५.५ |
| अकोला | ४२.५ | २७.४ |
| अमरावती | ४०.८ | २८.१ |
| बीड | ४३.६ | २८.९ |
| भंडारा | ४४.३ | २७.४ |
| बुलढाणा | ३६.७ | २५.७ |
| चंद्रपूर | ४३.२ | २९.१ |
| चेन्नई | ४३.१ | २६ |
| नवी दिल्ली | ३७.३ | २३.१ |
| धुळे | ३७.६ | २६.१ |
| गोंदिया | ४३.८ | २७ |
| जळगाव | ४०.९ | २७ |
| कोल्हापूर | ३७ | २१.८ |
| लातूर | ३७.७ | २६.२ |
| मुंबई | ३७.९ | २९.८ |
| नागपूर | ४१.६ | २७.५ |
| नांदेड | ४०.५ | २७.२ |
| नंदूरबार | ३५.७ | २५.७ |
| नाशिक | ३६.४ | २३.२ |
| पुणे | ३५ | २३ |
| पंढरपूर | ३९.२ | २६.४ |
| सातारा | ३७ | २१.९ |
| सांगली | ३७.९ | २३.१ |
| सोलापूर | ४०.८ | २७.५ |
| वर्धा | ४३.२ | २८.१ |

# आजचे राशिभविष्य

**मेष :** कामाचा ताण व दगदग वाढेल. जबाबदारी वाढेल. एखाद्या कामाची चिंता राहील. मात्र बरेचसे ग्रह अनुकूल आहेत.

**तुळ :** प्रवास सुखकर होतील. संततिसौख्य लाभेल. आर्थिक कामे पूर्ण करू शकाल. उधारी, उसनवारी वसूल होईल.

**वृषभ :** सध्या ग्रह अनुकूल असल्यामुळे कामाचा वेग वाढवावा व कामे पूर्ण करुन घ्यावीत. व्यवसायात अत्यंत चांगली परिस्थिती आहे.

**वृश्चिक :** काहींना अचानक धनलाभाची शक्यता आहे. कौटुंबिक सौख्य उत्तम लाभेल. एखादी महत्त्वाची बातमी समजेल. प्रवासास दिवस अनुकूल आहे.

**मिथुन :** भाग्यकारक घटना घडेल. सुसंधी व सुयश लाभेल. प्रसन्नता लाभेल. मानसन्मानाचे योग येतील. सार्वजनिक कार्यात यश लाभेल.

**धनु :** कुटुंबातील व्यक्तींसाठी विशेष खर्च कराल. आनंदी व आशावादी राहाल. महत्वाच्या कामांमध्ये यश मिळेल. महत्वाचे व्यवहार यशस्वी होतील.

**कर्क :** नोकरी, व्यवसायामध्ये उत्साहवर्धक घटना घडतील. गुंतवणुकीस दिवस अनुकूल आहे. प्रवास सुखकर होतील.

**मकर :** वैवाहिक सौख्य लाभेल. भागीदारी व्यवसायातील अडचणी कमी होतील. मात्र साडेसाती चालू असल्यामुळे सर्व व्यवहार काळजीपूर्वक करावेत.


**सिंह :** उत्साहाने कार्यरत राहाल. बौद्धिक प्रगतीच्या दृष्टीने दिवस विशेष अनुकूल आहे. काहींचे बौद्धिक परिवर्तन होईल.

**कुंभ :** तुमच्या व्यक्तिमत्वाचा इतरांवर प्रभाव राहील. आरोग्य उत्तम राहील. तुमचे मनोबल, जिद्द व चिकाटी वाढविणारी एखादी घटना घडेल.

**कन्या :** उधारी, उसनवारीची कामे पूर्ण होतील. नवीन परिचय व गाठीभेटी होतील. व्यवसायात नवीन हितसंबंध निर्माण होतील.

**मीन :** तुमच्या कार्यक्षेत्रात तुम्हाला मिळालेल्या संधीचे सोने करू शकाल. आत्मविश्वासाच्या जोरावर अनेक कामात यश मिळवाल.

# 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १२३



**आडवे शब्द**
६. बॉडीगार्डला मराठी शब्द
९. '..... चालविशी हाती धरोनिया' (संत तुकाराम)
११. आजोबा
१४. खराब
१६. एक पालेभाजी
१८. पिरॅमिडमधील शव
१९. वेडपट
२१. महादेव
२२. सैन्याची तुकडी
२३. पाप, २८. हस्त
२९. दागिने न घातलेली स्त्री
३२. भांडण
३३. हाक
३४. करार
३५. शेकडा प्रमाण
३६. रमलेला
३८. शुल्क
४०. वृद्धी
४२. अर्धचंद्र, हकालपट्टी
४३. युद्ध
४४. गवत नसलेली खेळपट्टी
४५. प्रहार
४६. थंडी
४७. नियंत्रण
४८. सुग्रीवाचा भाऊ
४९. गरीब
५०. सरशी
५१. बुद्धी
५२. फावला वेळ
५३. तेलुगु लोकांचा प्रांत
५४. मधुर
५५. इंद्राचा हत्ती
५७. यापासून साखर बनते
५९. तंबाखूचे चूर्ण
६१. चुरस
६३. ढीग
६४. आई
६५. याग
६६. पैसेवाला
६८. आजार
६९. अविरत, अखंड
७०. जमीन
७१. विधीमंडळाचा सदस्य

**उभे शब्द**
१. टवटवी
२. रुग्ण
३. नातलग
४. शत्रूला सामील
५. क्रांतिकारक चंद्रशेखर यांचे टोपणनाव
६. मंगळ
७. वेग
८. कुवत
१०. नित्य
११. उघडा पडणारा धातू!
१२. रेल्वेमंत्री (फक्त नाव)
१३. विष्ण
१५. '-- --- योग तुझा घडावा'
१६. फाजील
१७. तोंड
२०. पंथ, विचारधारा
२४. मनस्वी, भटक्या
२५. फार जुने
२६. वक्र
२७. रेटारेटी
२८. खिसेकापू
३०. धनुष्यबाण
३१. खिन्न
३७. पूर्वसूचना न देता, अचानक
३९. ओल्या वाटाण्याचे कालवण
४१. पाणी
४३. आतिथ्य
४४. एक चतुर्थांश
४७. हुकूम
४८. वारा
४९. छिद्र
५१. नक्कल, दर्जा
५३. फळांचा राजा
५४. श्रीकृष्णाचे सवंगडी
५६. नवरदेवाची आई
५८. संसदसदस्य
५९. शरीर
६०. प्रजा
६२. तर्क
६४. पंगतीत पाणी वाढण्याचे भांडे
६७. उत्साह

**जम्बो शब्दकोडे क्र. १२२ चे उत्तर**

आडवे उत्तर : २.सरकारी ५.वासुकी ८.कुडी ९.पाणिग्रहण १०.तथास्तु ११.रदबदली १३.टक १४.मस १५.शास्त्र १६.वार १७.नदी १९.उशीर २०.सखा २२.अंमल २६.नालायक २९.उबग ३०.हिमाचल प्रदेश ३२.रजा ३४.गवार ३५.हरण ३६.सवंग ३८.बगळा ३९.वितान ४०.कवटी ४१.पर्यटन ४२.नाना ४४.मांसल ४६.समयसूचकता ४९.मतलबी ५१.खडावा ५३.धाक ५४.बारा ५६.हेवा ५७.भाकरी ५९.खेटर ६०.तांबडा ६३.अडेल ६४.वादळ ६५.अंध ६६.रासभ ६८.मार्ग ६९.कामला ७१.मुंगळा ७२.डूल ७३.दृढ ७४.लहानसा ७५.शर ७७.नीर ७८.नाशवंत ७९.फाया

उभे उत्तर : १.माणिक २.सहनशील ३.रण ४.रीतसर ५.वास्तुशास्त्र ६.कीर ७.खबर ८.कुलीन ९.पाटव १२.दवाखाना १८.दीन १९.उमग २१.प्रिय २२.अंबर २३.सुमार २४.कोलकाता २५.संदेह २७.लाठी २८.करवंटी ३०.हिवाळा ३१.शरम ३३.जाग ३४.गगन ३६.सवलत ३७.आपत्ती ३८.बटवडा ३९.विनायक ४०.कसम ४२.नामधारी ४३.टोक ४५.तंबी ४७.चहाटळ ४८.ताबा ५०.लक्ष्मी ५१.खवा ५२.वाभाडे काढणे ५५.रातांधळा ५६.हेमामालिनी ५८.कलम ५९.खेदजनक ६१.डारडूर ६२.लोभ ६५.अंगदेश ६७.सल ७०.लालसा ७५.शत ७६.क्रिया

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### सावधान! राज्यभरात शनिवारपासून 22 एप्रिलपर्यंत अवकाळी पावसाचा अंदाज

पुणे (दैनिक संध्या) : राज्यात शनिवार (दि. 18) पासून 22 एप्रिलपर्यंत पुन्हा एकदा अवकाळी पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. त्यामुळे कमाल तापमानात किंचित घट होणार असून काही दिवसांपासून उकाड्याने त्रस्त झालेल्या नागरिकांना दिलासा मिळू शकतो. शुक्रवारी अकोला, अमरावतीचे तापमान 44.2, तर पुणे 40 अंशांवर पोहोचले होते. एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात पाच दिवस पाऊस होता. त्यानंतर पुन्हा तापमान वाढले. दुसरा आठवडा चांगलाच उष्णतेचा राहिला. आता 18 ते 22 एप्रिल या चार दिवसात पुन्हा अवकाळी पावसाचा इशारा देण्यात आला आहे. तापमान : अकोला 44.2, अमरावती 44.2, पुणे 40, जळगाव 41.5, कोल्हापूर 38.1, महाबळेश्वर 33.1, मालेगाव 43.4, नाशिक 37.5, सांगली 39.5, सातारा 41.2, सोलापूर 43.4, धाराशिव 41.2, छत्रपती संभाजीनगर 41.4, परभणी 42, बीड 40.8,, बुलडाणा 41.5, ब्रह्मपुरी 43.2, चंद्रपूर 43.4, गोंदिया 41.9, नागपूर 43.2, वाशीम 43.6, वर्धा 44, यवतमाळ 43.2.



### पुण्यात अनधिकृत ओव्हरहेड केबल कारवाई थंडावणार? नव्या नियमावलीची प्रतीक्षा

पुणे (दैनिक संध्या) : शहरात अनधिकृत ओव्हरहेड केबलविरोधातील महापालिकेची सुरू असलेली कारवाई आता थंडावण्याची शक्यता आहे. केंद्र सरकारच्या ऊर्जा व दूरसंचार मंत्रालयाने 2023-24 मध्येच यासंदर्भात नियमावली जाहीर करून राज्य सरकार व महापालिकांना त्यानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या असताना प्रशासनाने याची माहिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांना कारवाईला दोन आठवडे होऊनही दिली नाही. गुरुवारी झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीत ही माहिती प्रशासनाने दिली असून, स्थानिक पातळीवर स्वतंत्र नियमावली तयार करणे आवश्यक असल्याचे महापालिका प्रशासनाने स्पष्ट केले. त्यामुळे सध्या सरसकट कारवाई करता येणार नसल्याचे प्रशासनाने सांगितले. केंद्राच्या मार्गदर्शक सूचनांनुसार शहरासाठी स्वतंत्र नियमावली तयार करण्याचे काम हाती घेतले आहे. त्यानुसार अत्यावश्यक सेवांच्या केबल्स तत्काळ काढता येणार नसून, त्या ठरवलेल्या नियमांच्या चौकटीत बसवाव्या लागणार आहेत. तसेच, प्रतिकिलोमीटर एक हजार रुपये दर आकारून या केबल्स नियमित करण्याच्या सूचना दिल्या आहेत. महापालिकेच्या पथदिव्यांच्या खांबांचा वापर केबल टाकण्यासाठी करता येईल, असेही प्रस्तावित नियमांमध्ये नमूद केले. या नव्या नियमावलीसाठी महापालिकेने विशेष समिती स्थापन केली असून, त्यात विविध टेलिकॉम कंपन्यांचे प्रतिनिधी तसेच महापालिकेचे अधिकारी सहभागी आहेत. ही समिती पुढील दहा दिवसांत नियमावली तयार करणार असल्याची माहिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी दिली. गेल्या 20 दिवसांत एकही गुन्हा दाखल झालेला नाही किंवा संबंधित व्यावसायिकांनी दंड भरण्यासाठी पुढाकार घेतलेला नाही. याशिवाय, या कारवाईवरून महापौर आणि स्थायी समिती अध्यक्ष यांच्यात श्रेयवादाची स्पर्धाही रंगताना दिसत आहे. त्यामुळे अनधिकृत केबलचा प्रश्न सुटणार की अधिक गुंतागुंतीचा होणार, हे येत्या काळात स्पष्ट होणार आहे. स्थायी समिती अध्यक्ष भिमाले यांनी शहरातील अनधिकृत केबलवर कारवाईचा बडगा उगारला होता. भिमाले यांनी थेट रस्त्यावर उतरत अनधिकृत केबलच्या विरोधात कारवाई केली होती. या कारवाईनंतर प्रशासनाला ठोस नियमावली करण्याचे आदेश दिले आहेत. शहरांमध्ये मोठ्या कंपन्यांच्या अनधिकृत ओव्हरहेड केबल आहेत, तसेच एका कंपनीने महापालिकेची कोणतीही परवानगी न घेता भूमिगत केबल टाकल्याची माहिती समोर आली आहे. याची चौकशी करण्याचे आदेश भिमाले यांनी प्रशासनाला दिले आहेत. या कंपनीवर दंडात्मक कारवाई करून ती वसूल करणार असल्याचा विश्वास देखील त्यांनी व्यक्त केला. तसेच या प्रकारे नियम बाजूला सारून भूमिगत केबल टाकणाऱ्या आणखी काही कंपन्या आहेत का, याचा देखील शोध घेऊन त्यांच्यावर कडक कारवाई केली जाणार असल्याचा इशारा भिमाले यांनी या वेळी दिला.

### रविवारी भगवान परशुराम जन्मोत्सवनिमित्ताने दुचाकी फेरीचे आयोजन

पुणे (दैनिक संध्या) : पुणे शहरातील विविध ब्राह्मण संघटना, संस्था एकत्रितपणे "सकल ब्राह्मण समाज" नावाने दरवर्षी भगवान परशुराम जन्मोत्सवाचे कार्यक्रम घेत असतात. यावर्षी सर्व हिंदू समाजाला सोबत घेत रविवार, दि. १९ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ९ वाजता शनिवारवाडा येथून दुचाकी फेरीचा प्रारंभ होऊन सांगता केसरीवाडा येथे होणार असल्याचे सकल ब्राह्मण समाज संघटनेचे प्रमुख विश्वजीत देशपांडे, भालचंद्र कुलकर्णी, विश्वनाथ भालेराव, राजेंद्र कुलकर्णी व मनोज तारे यांनी आज येथे सांगितले. यावेळी दुचाकी फेरीचा शुभारंभ पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे, आमदार हेमंत रासने आदि मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात येणार आहे. सकाळी ८.३० वाजता सुरुवातीला कसबा गणपती मंदिरात आरती करुन त्यानंतर लालमहालातील छत्रपती शिवाजी महाराज आणि जिजाऊ माता यांना अभिवादन करून त्यानंतर सकाळी ९ वाजता प्रत्यक्ष दुचाकी फेरीची सुरुवात शनिवारवाडा येथील थोरले बाजीराव पेशवे यांच्या पुतळ्याला हार घालून केली जाणार आहे. त्यापुढे जंगली महाराज रोडवरील झाशीची राणी लक्ष्मीबाई पुतळा, पुढे डेक्कन जिमखाना येथे छत्रपती संभाजी महाराज पुतळा, पुढे अलका टॉकीज चौकात न. चिं. केळकर व सेनापती बापट पुतळा, पुढे शास्त्रीरोडवरुन सारसबाग कॉर्नर येथे स्वा. सावरकर पुतळा, पुढे सारसबागेसमोरील अण्णाभाऊ साठे, अहिल्याबाई होळकर, सावित्रीबाई फुले यांचे पुतळे, पुढे बाजीराव रोडवरील सार्वजनिक काका पुतळा व त्यानंतर शेवटी केसरीवाडा येथे लोकमान्य टिळकांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करुन दुचाकी फेरीची सांगता होईल.

# पुणे विमानतळावर भारतीय हवाई दलाच्या विमानाचा अपघात

## विमानाचे लँडिंग गिअर निकामी; ५ तास विमानसेवा ठप्प राहणार, मध्यरात्रीसह पहाटेची विमानसेवा विस्कळीत

पुणे (दै. संध्या)

पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावर मध्यरात्री एक मोठी खळबळजनक घटना घडली. रात्री सुमारे 12 च्या सुमारास भारतीय हवाई दलाच्या एका लढाऊ विमानाचा अपघात झाला. या विमानाचे लँडिंग करताना लँडिंग गिअर निकामी झाले. या तांत्रिक बिघाडामुळे विमान धावपट्टीवरच अडकून पडल्याने धावपट्टीवरील वाहतूक पूर्णपणे बंद करण्यात आली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, भारतीय हवाई दलाच्या या विमानातील सर्व कर्मचारी सुरक्षित असून कोणतीही जीवितहानी किंवा नागरी मालमत्तेचे नुकसान झालेले नाही. धावपट्टीवर विमान अडकल्याने नागरी विमानांच्या उड्डाणांवर आणि लँडिंगवर मोठा परिणाम झाला आहे. पुणे विमानतळावर रात्रीत उतरणारी विमाने दुसऱ्या विमानतळांवर उतरवण्यात आले आहेत तर पुण्यातून उड्डाण करणारी विमाने थांबवण्यात आली आहे. पुढील चार ते पाच तास येथील विमानसेवा बंद राहण्याची शक्यता आहे, असे विमानतळ संचालक संतोष ढोके यांनी स्पष्ट केले. ते म्हणाले की, धावपट्टी पुन्हा कार्यान्वित करण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत.

भारतीय हवाई वाहतूक नियंत्रण केंद्रानुसार (एटीसी), धावपट्टीवरील अडथळा दूर करून कामकाज पूर्ववत करण्यासाठी किमान ४ ते ५ तासांचा कालावधी लागू शकतो. यामुळे अनेक विमानांचे वेळापत्रक कोलमडले असून प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागत आहे.

या घटनेबाबत केंद्रीय हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ म्हणाले, पुणे विमानतळावरील परिस्थितीवर मी स्वतः लक्ष ठेवून आहे. विमानतळ संचालक आणि हवाई दलाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मी सतत संपर्कात आहे. विमानातील कर्मचारी सुरक्षित असून, संबंधित विमान कंपन्यांना या विलंबाबाबत कल्पना देण्यात आली आहे. अंदाजे ५ तासांत सेवा पूर्ववत होईल, असा विश्वास आहे.

**प्रवासाला निघण्यापूर्वी विमान कंपन्यांशी संपर्क करा...**

पुणे विमानतळावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी आपल्या विमानाची सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी संबंधित विमान कंपनीशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## पुणे महापालिकेचा 15,669 कोटींचा अर्थसंकल्प मंजूर

पुणे (दै. संध्या)

महापालिकेच्या 2026-27 या आर्थिक वर्षासाठी सुमारे 15,669 कोटी रुपयांचे अंदाजपत्रक मुख्य सभेत मंजूर करण्यात आले आहे. या अंदाजपत्रकातील अपेक्षित उत्पन्न साध्य करण्यासाठी, तसेच महसूल वाढीसाठी विविध उपाययोजना राबविण्याच्या उद्देशाने स्थायी समिती सदस्य आणि प्रशासनातील अधिकाऱ्यांची संयुक्त समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, अशी माहिती स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी दिली.

या समितीमध्ये स्थायी समितीतील काही निवडक सदस्यांचा समावेश करण्यात आला असून, त्यात श्रीनाथ भिमाले, विशाल धनावडे, संदीप बेलदरे, रूपाली धाडवे, मयूरी कोकाटे, प्रशांत जगताप आणि सुहास टिंगरे यांचा समावेश आहे. प्रशासनाच्या बाजूने महापालिका आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, तसेच संबंधित विभागांचे प्रमुख अधिकारी या समितीमध्ये सहभागी राहणार आहेत.

महापालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी करसंकलनात सुधारणा करणे, थकबाकी वसुलीला गती देणे, नवीन महसूल स्रोतांचा शोध घेणे, तसेच विविध आर्थिक उपाययोजनांचा आढावा घेणे, ही या समितीची प्रमुख जबाबदारी असेल. या माध्यमातून आर्थिक शिस्त मजबूत करत अंदाजपत्रकातील उद्दिष्ट पूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

## 11 महिन्याच्या चिमुकलीचा चुकीच्या पद्धतीने उपचार केल्याने मृत्यू

### पुण्याच्या 4 डॉक्टरांविरुद्ध गुन्हा; वैद्यकीय निष्काळजीपणामुळे बालिकेचा मृत्यू

पुणे (दै. संध्या)



बालकावर चुकीचे उपचार केल्याने त्याचा मृत्यू झाल्याच्या आरोपावरून नवी पेठेतील एका रुग्णालयातील डॉक्टरांसह परिचारिकेविरुद्ध सहकारनगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. या प्रकरणी डॉ. मुकुंद संगमनेरकर, डॉ. गणेश आरेकर, डॉ. श्रीधर जाधव, डॉ. राधा संगमनेरकर, तसेच परिचारिका मनीषा शिंदे, सारिका सुतार यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

हनुमंत गणपतराव गिते (वय ३४, रा. हेरंब सोसायटी, बालाजीनगर, धनकवडी) यांनी सहकारनगर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, महाराष्ट्र वैद्यकीय व्यावसायिक अधिनियम २०२३ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हनुमंत गिते यांची मुलगी आदिती (वय ११ महिने) हिला उलटीचा त्रास होत असल्याने तिला मे २०२५ रोजी नवी पेठेतील एका खासगी रुग्णालयात उपचारांसाठी दाखल केले होते.

उपचारात हलगर्जी केल्यास मुलीचा मृत्यू होऊ शकतो, याची जाणीव डॉक्टरांना होती. डॉक्टर, तसेच परिचारिकेने चुकीच्या पद्धतीने उपचार केल्याने मुलीचा मृत्यू झाल्याचा आरोप गिते यांनी पोलिसांकडे दिलेल्या तक्रारीत केला होता. पोलिस उपनिरीक्षक काळे तपास करीत आहेत.

**समितीच्या अहवालानंतर गुन्हा दाखल**

हे प्रकरण चौकशीसाठी ससून रुग्णालयातील वैद्यकीय तज्ज्ञांच्या समितीकडे सोपविण्यात आले होते. या प्रकरणाची वैद्यकीय तज्ज्ञांच्या समितीने चौकशी केली. चौकशीत अकरा महिन्यांच्या बालिकेवर चुकीच्या पद्धतीने उपचार करण्यात आले. वैद्यकीय निष्काळजीपणामुळे बालिकेचा मृत्यू झाल्याचा निष्कर्ष वैद्यकीय तज्ज्ञांच्या समितीने नोंदविला. त्यानंतर या प्रकरणात गुन्हा दाखल करण्याचे आदेश देण्यात आले.

## पुस्तके व गणवेश खरेदीस सक्ती केल्यास कारवाई

### पालकांच्या तक्रारीनंतर शिक्षण विभागाचे निर्देश; नियमभंग करणाऱ्या शाळांवर कठोर कारवाईचा इशारा

पुणे (दै. संध्या)



खासगी शाळां कडून विद्यार्थ्यांना ठरावीक दुकानातूनच किंवा शाळेतूनच शालेय साहित्य खरेदी करण्याची सक्ती केली जाते. या माध्यमातून पालकांची मोठ्या प्रमाणात आर्थिक लूट केली जाते. यासंदर्भात तक्रारी प्राप्त झाल्यामुळे खासगी शाळांनी शैक्षणिक साहित्य खरेदीची सक्ती पालकांवर करू नये, अन्यथा त्यांच्यावर कडक कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा प्राथमिकचे संचालक शरद गोसावी तसेच माध्यमिकचे संचालक डॉ. महेश पालकर यांनी दिला आहे.

दोन्ही संचालकांनी दिलेल्या निर्देशानुसार, सर्व व्यवस्थापनांच्या व सर्व माध्यमांच्या खासगी प्राथमिक व माध्यमिक शाळांकडून गणवेश व इतर शैक्षणिक साहित्य विशिष्ट दुकानातून किंवा शाळेतूनच खरेदी करण्याची सक्ती करण्यात येऊ नये. याबाबतच्या सूचना सर्व व्यवस्थापनांच्या व सर्व माध्यमांच्या शाळांना द्याव्यात, याबाबत तक्रारी प्राप्त झाल्यास शिक्षणाधिकारी, प्रशासन अधिकारी यांनी शहानिशा करून तथ्य आढळल्यास संबंधित शाळेवर कठोर कारवाई करावी, असे स्पष्ट केले आहे.

राज्य मंडळ, सीबीएसई, आयसीएसई मंडळाशी संलग्न शाळांनी एनसीईआरटी तसेच बालभारतीची पाठ्यपुस्तके वापरावीत.

अन्य मंडळांच्या शाळांनी त्या-त्या मंडळांनी प्रमाणित केलेली पाठ्यपुस्तके वापरावीत. गणवेश व इतर शैक्षणिक साहित्य विशिष्ट दुकानातून किंवा शाळेतूनच खरेदी करण्याची सक्ती करण्याबाबत प्राप्त होणाऱ्या तक्रारींसाठी कार्यालयाचा ई-मेल आयडी प्रसिद्ध करावा तसेच विषयाच्या अनुषंगाने नोडल अधिकारी यांची नेमणूक करावी, अशा स्पष्ट सूचना देखील गोसावी आणि डॉ. पालकर यांनी दिल्या आहेत.

**सक्ती करणार नसल्याचा ठरावही घ्यावा**

कोणत्याही शाळेने विशिष्ट खासगी प्रकाशनांच्या पुस्तकांचा वापर करण्याचे बंधन तसेच सक्ती विद्यार्थ्यांना करू नये. खासगी प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळांमधील कार्यरत शाळा व्यवस्थापन समितीमध्ये विद्यार्थ्यांना गणवेश व इतर शैक्षणिक साहित्य विशिष्ट दुकानातून किंवा शाळेतूनच खरेदी करण्याची सक्ती करण्यात येणार नसल्याचा ठराव घेण्याबाबत तत्काळ कार्यवाही करावी.

## साहित्य परिषदेच्या बैठकीत उपाध्यक्ष-विश्वस्त निवड पुढे ढकलली

पुणे (दै. संध्या)

नवनिर्वाचित कार्यकारिणीच्या पहिल्याच महत्त्वपूर्ण बैठकीत उपाध्यक्ष आणि विश्वस्तपदाच्या निवडीदरम्यान काही जुनीच नावे पुढे करण्याचा प्रयत्न झाला. मात्र, या पदांच्या निवडीबाबत अधिक व्यापक चर्चा व्हावी, नव्या नावांनाही संधी मिळावी, यासाठी उपाध्यक्ष आणि विश्वस्तपदाच्या निवडीचा निर्णय पुढे ढकलण्यात आला. पुढील 40 दिवसांत पुन्हा बैठक घेऊन अंतिम निर्णय घेतला जाणार आहे, अशी माहिती महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष योगेश सोमण यांनी गुरुवारी (दि.16) पत्रकार परिषदेत दिली.

मसापच्या कार्यकारिणी बैठकीत विविध विषयांवर चर्चा झाली. त्याचीच माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेला प्रमुख कार्यवाह स्वाती महाळंक, कोषाध्यक्ष प्रदीप निफाडकर, कार्यवाह सुनील महाजन, प्रसाद मिरासदार उपस्थित होते. गुरुवारी झालेल्या कार्यकारिणीच्या बैठकीत 31 पैकी 28 सदस्य उपस्थित होते. सकारात्मक वातावरणात ही बैठक पार पडली असून, सर्व निर्णय एकमताने घेण्यात आल्याची माहिती पदाधिकाऱ्यांनी दिली. मसाप पत्रिकेच्या संपादकपदी सुरेश देशपांडे यांची फेरनिवड केली, तर जयंतराव येलूरकर (अहिल्यानगर) आणि संजीव गिरासे (धुळे) यांची विभागीय कार्यवाह म्हणून निवड झाली आहे. त्यामुळे बिनविरोध निवडून आलेल्या प्रतिनिधींनी कोणताही विरोध न करता उपाध्यक्ष आणि विश्वस्तपदाचा निर्णय पुढे ढकलण्यास संमती दिली. दरम्यान, बैठकीत परिषदेच्या कायदेशीर कामकाजासाठी ॲड. केदार सोमण यांची 2026 ते 2028 या कालावधीसाठी विधी सल्लागार म्हणून निवड करण्यात आली.

# अनधिकृत होर्डिंग्जचा गोंधळ; 80 कोटी थकबाकी वसुलीचे आदेश

## अचूक आकडेवारीच नाही; नव्या सर्वेक्षणाचा निर्णय, पालिकेच्या कारभारावर प्रश्नचिन्ह

पुणे (दै. संध्या)

शहरात किती अनधिकृत होर्डिंग्ज आहेत, याबाबत यापूर्वी सर्वेक्षण होऊनही अधिकृत आकडेवारी प्रशासनाकडे उपलब्ध नसल्याचे गुरुवारी झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीत उघड झाले. अधिकृत व अनधिकृत होर्डिंग्जची अचूक मोजणी करण्यासाठी महापालिका प्रशासनाने पुन्हा नव्या संस्थेची नियुक्ती करण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबत विचारले असता, ही माहिती मिळविण्यासाठीच सर्वेक्षण करण्यात येणार असल्याचे स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी सांगितले. तसेच 2013 ते 2018 या कालावधीतील सुमारे 80 कोटी रुपयांची थकबाकी वसूल करण्याचे आदेश दिल्याची माहिती त्यांनी दिली.

शहरात ठिकठिकाणी अनधिकृत होर्डिंग्ज उभारण्यात आले असले तरी ती अधिकृत, की अनधिकृत याची नेमकी माहिती महापालिका प्रशासनाकडे नसल्याचे समोर आले. गेल्या काही दिवसांत केवळ 67 अनधिकृत होर्डिंग्जवर कारवाई केल्याची माहिती आकाशचिन्ह विभागाने स्थायी समितीला दिली. शहरात सुमारे एक हजार ते दीड हजार अनधिकृत होर्डिंग्ज असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. मात्र, अधिकृत आकडेवारीसाठी पुन्हा संस्थेमार्फत सर्वेक्षण करणार आहे.

शहरातील अधिकृत होर्डिंगधारकांकडून 70 ते 80 कोटी रुपयांची थकबाकी असल्याचेही समोर आले आहे. ही रक्कम वसूल करण्यासाठी महापालिका प्रशासनाने कारवाई सुरू करण्याचा निर्णय घेतला असून, एक महिन्याच्या आत वसुली पूर्ण करण्याचे आदेश स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी आकाशचिन्ह विभागाला दिले आहेत. मात्र, पुन्हा सल्लागार संस्थेची नियुक्ती केल्यामुळे वाद निर्माण होण्याची शक्यता आहे.

शहरातील एकूण अधिकृत होर्डिंग्जची संख्या विचारल्यानंतर प्रशासनाकडे ठोस उत्तर नसल्याने बैठकीत वातावरण तापले. “महापालिकेला स्वतःच्या हद्दीतील होर्डिंग्जची माहिती नाही का, की ती लपवली जात आहे?” असा सवाल उपस्थित केला. यावर अध्यक्ष भिमाले यांनी नुकताच पदभार स्वीकारल्याचे सांगत सविस्तर माहिती घेण्याचे आश्वासन दिले.

2013 ते 2018 या कालावधीत होर्डिंगच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार झाल्याचेही समोर आले. अनेक जाहिरातदारांनी एका परवानगीवर अनेक होर्डिंग्ज उभारून पालिकेची फसवणूक केल्याची कबुली देण्यात आली. या प्रकारामुळे महापालिकेचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून, 70 ते 80 कोटी रुपयांची थकबाकी अद्याप वसूल झालेली नाही.



ही थकबाकी वसूल करण्यासाठी प्रतिचौ.फूट 222 रुपये दर आकारण्यात येणार असल्याचे भिमाले यांनी सांगितले. तसेच प्रत्येक होर्डिंगवर जाहिरातदाराचे नाव व अधिकृत मोबाईल क्रमांक छापणे बंधनकारक करण्यात येणार आहे. 15 मेपासून नव्या एजन्सीद्वारे अधिकृत व अनधिकृत होर्डिंग्जचे सर्वेक्षण होणार आहे. महापालिकेच्या परवाना आणि आकाशचिन्ह विभागांतर्गत येणाऱ्या जाहिरात फलकांच्या (होर्डिंग्ज) वसुलीबाबत धक्कादायक माहिती समोर आली आहे. लेखापरीक्षण अहवालानुसार तब्बल 404 कोटी रुपयांहून अधिक रक्कम वसुलीपात्र असल्याचे स्पष्ट झाले आहे. मात्र, प्रत्यक्षात किती वसुली करण्यात आली, याचा तपशील देण्यास संबंधित विभाग टाळाटाळ करत असल्याचे दिसून येत आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...

SIGNATURE GLOBAL

### सिग्नेचर ग्लोबल आणि टोनिनो लॅम्बोर्गिनी यांच्याकडून लक्झरी ब्रांडेड निवासी प्रकल्प

मुंबई (दैनिक संध्या) : भारतातील आघाडीच्या रिअल इस्टेट डेव्हलपर्सपैकी एक असलेल्या सिग्नेचर ग्लोबलने सेक्टर ७१, गुरुग्राम येथे प्रीमियम निवासी प्रकल्पाच्या विकासासाठी इटालीतील प्रसिद्ध लाइफस्टाइल ब्रँड टोनिनो लॅम्बोर्गिनी यांच्याशी रणनीतिक सहकार्याची घोषणा केली आहे. प्रसिद्ध कारागिरी, डिझाईनची उत्कृष्टता आणि लक्झरी जीवनशैलीसाठी जगभरात ओळखल्या जाणाऱ्या प्रतिष्ठित अशा टोनिनो लॅम्बोर्गिनी ब्रँडच्या अंतर्गत इटालियन निवासी अनुभव या एक्सक्लूझिव्ह विकासातून सादर होणार आहे. या भागीदारीतून टोनिनो लॅम्बोर्गिनीचा भारतातील निवासी रिअल इस्टेट बाजारपेठेत लक्षणीय प्रवेश होत असून ब्रँडेड निवासी घरांच्या क्षेत्रात एक नवीन मापदंड निर्माण होणार आहे. हा प्रकल्प सुमारे १२.४० एकरांवर पसरला असून या विकासप्रकल्पात ३, ४ व ४.५ बीएचके प्रकारांमधील ८१२ प्रीमियम निवासस्थाने आकर्षण ठरणार आहेत. धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाच्या अशा सेक्टर ७१, सदर्न पेरिफेरल रोड येथे त्याचे स्थान आहे - हे स्थान गुरुग्रामधील सर्वाधिक वेगाने वाढणाऱ्या रिअल इस्टेट कॉरिडॉरपैकी एक आहे. सॅव्हिल्स इंडियाच्या मते, ब्रँडेड रेसिडेन्सेस सेगमेंटला जागतिक पातळीवर सातत्याने मोठी गती मिळत आहे. या सेगमेंटमधील योजनांची एकूण संख्या डिसेंबर २०२४ मधील ७६४ वरून २०२५ च्या अखेरीस ९१० पर्यंत वाढण्याचा अंदाज आहे, ही वार्षिक १९ टक्क्यांची भरीव वाढ आहे. नाईट फ्रँकच्या 'द वेल्थ रिपोर्ट'नुसार, भारताला जागतिक पातळीवर पहिल्या १० देशांमध्ये स्थान असून तो आपले स्थान झपाट्याने मजबूत करत आहे - सध्या तो जागतिक पातळीवर सहाव्या क्रमांकावर असून जागतिक पुरवठ्यात त्याचे सुमारे ४ टक्के योगदान आहे.


### जाहिर नोटीस

तमाम लोकांस विषेशतः गाव मौजे पिंपळगाव सिध्दनाथ, ता. जुन्नर, जि. पुणे आसपासचे तसेच जुन्नर तालुक्यातील सर्व लोकांना आमचे आशिलांनी सांगितलेवरून व दिलेल्या माहितीवरून या जाहीर नोटीसीने कळविण् यात येते की,

खालील वर्णन केलेली मिळकत श्री. नंदकुमार पांडूरंग वाणी यांनी रजि. खरेदीखत दस्त नं. ३३१२/२०२२ अन्वये दि. २४/११/२०२२ रोजी खरेदी केलेली आहे. त्यांचे नाव सातबारा उतारावर मालक सदरात दाखल आहे. सध्याचे विद्यमान मालकांनी खालील वर्णन केलेले क्षेत्र आमचे आशिलास खरेदी देण्याचे ठरविले आहे. संबंधित जमीनीत इतर कोणाचाही हित हक्कसंबंध तसेच सदर जमीन निर्वेध, निजोखमी असल्याबाबत व कोणत्याही संपादनाचा भाग असल्यास आमचे आशिलांस तशी खात्री दयावी. या जाहीर नोटीसीने सर्वांना कळविण्यात येते की, वरील जमिनी संदर्भात कोणाचीही मालकी हक्क, हितसंबंध वहिवाट, बक्षिसपत्र, लीन, गहाण दान, लीज, भाडेपटटा, खरेदी विक्री, साठेखत वगैरे मार्गाने या अगोदर व्यवहार झाले असल्यास अथवा त्यासंबंधातील काही कागदपत्रे असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून आठ दिवसाचे आत खालील पत्यावर योग्य त्या पुराव्यानिशी संपर्क साधावा व खात्री करून द्यावी. अन्यथा सदर मिळकत ही निर्वेध, निजोखमी अशी असून सदर मिळकतीशी इतर कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व तो असल्यास जाणीवपूर्वक सोडून दिला आहे असे समजून आमचे अशिल पुढील व्यवहार पूर्ण करतील त्यानंतर कुणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून मुद्दाम ही जाहीर नोटसि प्रसिध्द केली आहे.

मिळकतीचे वर्णन गाव मौजे पिंपळगाव सिध्दनाथ, ता. जुन्नर, जि. पुणे येथील खाते नं. १०५८, गट नं. ६/२, क्षेत्र-०. ३०पै या मिळकती पैकी पूर्व-उत्तर कोप-यातील सामाईकातील मिळकत वर्णन०. १७. ५आर, आकार ०.२४ यातील सर्व हक्क, जाणेयेणेच्या वहिवाटीसह हा या नोटीसीचा विषय आहे.

ॲड. रोहिणी लक्ष्मण गाडेकर
(बी.ए.एल.एल.बी. डी. एल. एल.)
रा. सुर्या हाईटस, ओ-विंग, फ्लॅट नं. १०७,
कल्याण पेठ, जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे. ४१०५०२.
मोबाईल नं. ९८६०४८३०३१.



महानिर्मिती — महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

### इ-निविदा सूचना
क्र.ना.औ.वी.कें/२०२६-२७/०१

| अ. क्र. | निविदा क्र./ विभाग | निविदा तपशील | अंदाजे रक्कम (रू.) / इसारा रक्कम (रू.) |
|---|---|---|---|
| १. | ३००००६७६५२ / ईएम | एच.टी. मोटर्स (६.६ केव्ही) चे वॉटर कुलर आणि एअर कुलर स्वच्छ करण्यासाठी वार्षिक कामाचा करार. (रिफ्लोटेड) | ५,१२,८०९/- / ८,६३०/- |
| २. | ३००००६७३८१ / ओएस | युनिट-४ स्टेज -२ च्या आरसीएफ, इनलेट पाईप व बंकर नेकमधील चोक अप काढण्यासाठी कामाचे कंत्राट. | ३२,९२,२४५/- / ३६,४३०/- |
| ३. | ३००००६७६६२ / ईएम | एनटीपीएस कॉलनी येथे एलटी /एचटी ट्रान्सफॉर्मर, ११ केव्ही ओव्हरहेड लाईन व विविध ठिकाणी गवत व झुडपे हटविणे व झाडे छाटण्याचे काम (रिफ्लोटेड) | १,६८,५००/- / ५,१८५/- |
| ४. | ३००००६७६६० / ओडीपी | ETP-I, ETP-II, AWR संप, गाळाचा खड्डा, फेज २, HP रॉ वॉटरची टाकी आणि बुस्टर पंप ड्रेन पिट आणि राख बंधारा परिसरात वाहतुकीसह साफसफाई/राख काढण्यासाठी कामाचा करार. (आवश्यक असेल तेव्हा) (रिफ्लोटेड) | २८,९२,१६०/- / ३२,४२५/- |
| ५. | ३००००६७५९२ / सेफ्टी | एनटीपीएस येथिल कर्मचा-यांसाठी सुरक्षा शुज सारख्या संरक्षणात्मक उपकरणांची खरेदी. (रिफ्लोटेड) | १२,०९,६००/- / १५,६००./- |
| ६. | ३००००६७५९४ / सिव्हिल | पाण्यातील तण, गाळ काढणे व राख बंधारे खोरे क्र. ४ अ ते कोटमगाव गावापर्यंतचा नाला क्र.२ ची साफसफाई करणे (रिफ्लोटेड) | १,०९,१२५/- / ३,२८०/- |
| ७. | ३०००००६७५९८ / बीएम | युनिट ३,४,५ साठी बॉयलरसाठी APH मेन ड्राइव्ह गियरबॉक्ससाठी फ्लुइड कपलिंग आणि स्पेअर्सची खरेदी. (रिफ्लोटेड) | ४,७१,६९६/- / ८,२२०/- |
| ८. | ३००००६७६०२ / बीएम | एअर प्रीहीटर ड्राइव्ह युनिट गिअर बॉक्सच्या दुरूस्तीचे काम. (रिफ्लोटेड) | ५५,८०,०००/- / ५९,३००/- |
| ९. | ३००००६७६०३ / बीएम | ६.६ के.व्ही एचटी मोटर्सच्या पांढऱ्या धातुच्या जर्नल आयडी, पीए, एफडी पंख्याचे बेअरिंग देखभालीसाठी कामाचा करार. (आवश्यकतेनुसार). (रिफ्लोटेड) | ७,२१,४८४/- / १०,७५०/- |
| १०. | ३००००६७५९३ / टीएम | पीसीआर ए.सी. प्लांट व कॉम्प्रेसरच्या (प्रकार-एसएमसी-४-१००,आर -२२ सेरीज) स्पेअर्सचा पुरवठा. (रिफ्लोटेड) | ९,४१,४३०/- / १२,९१५/- |
| ११. | ३००००६७५९५ / टिएम | BFP वर्किंग ऑईल कुलर ईरेक्शनचे काम (रिफ्लोटेड) | ४,१०,६७६/- / ७,६१०/- |
| १२. | ३००००६७५९६ / ईएम | कॉलनी व ओडीपी विभाग क्षेत्रातील केबल टाकणे/ काढणे आणि संबंधित कामांसह उत्खनन कामाचे वार्षिक कंत्राट. (रिफ्लोटेड) | ३,५९,०२५/- / ७,०९०/- |
| १३. | ३००००६७५९७ / डब्लुटीपी | मायक्रो पलव्हरायझर जीएमपी मॉडेलसाठी सुटे भागांचा पुरवठा. (रिफ्लोटेड) | ३,२८,४४०/- / ६,८००/- |
| १४. | ३००००६७५९९ / टिएम | संच क्र. ३/४/५ 210 MW LMWT.G. सेट च्या कंडेन्सर टयूब क्लिनिंग हायड्रो जेटिंग/ बुलेट शॉट पध्दतीने ९ मीटर हायड्रो फील चाचणी आणि त्यातील गळती काढण्यासाठी वार्षिक दुरूस्ती/ शॉर्ट शटडाऊन दरम्यान / आवश्यकतेनुसार कंत्राट. (रिफ्लोटेड) | २७,४९,८४८/- / ३१,०००/- |

नविन विक्रेते / नोंदणी नसलेल्या विक्रेत्यांना विनंती आहे की त्यांनी त्यांच्या कंपनीची ई-टेंडरिंगसाठी नोंदणी करावी.
अधिक तपशीलांसाठी वेबसाइटवर लॉग इन करा.
प्रत्येक निविदा किंमत रू. ११८०/-, अधिक माहिती व अद्यतनांसाठी कृपया https://eprocurement.mahagenco.in येथे भेट द्यावी.

मुख्य अभियंता,
नाशिक औ.वि.केंद्र, एकलहरे


## महिलांना कृषी क्षेत्रात नेतृत्व मिळवून देण्यासाठी गोदरेज अग्रोव्हेटची मोठी गुंतवणूक

**बारामती (दै. संध्या) :**

अन्न आणि कृषी क्षेत्रातील आघाडीची कंपनी असलेल्या गोदरेज अग्रोव्हेट लिमिटेड कंपनीने नेहमीच संशोधन आणि विकासावर भर दिला आहे. नुकतेच गोदरेज अग्रोव्हेट कंपनीने विमेन इन अग्रीकल्चर समिटच्या तिस-या आवृत्तीमध्ये नव्या कार्यक्रमाची घोषणा केली आहे. कंपनीकडून 'दिशा' या नावाने महिला करिअर प्रवेगक कार्यक्रमाची घोषणा करण्यात आली आहे. कृषी क्षेत्रामध्ये सर्वसमावेशक आणि भविष्यातील आव्हानांसाठी सज्ज असलेली टॅलेंट इकोसिस्टम निर्माण करण्याप्रती आपली वचनबद्धता सिद्ध करण्यासाठी कंपनीने हे पाऊल उचलले आहे. कृषी क्षेत्रातील महिलांच्या व्यावसायिक प्रगतीला वेग देणे, त्यांना नेतृत्व पदांसाठी सक्षम करणे, हा यामागील उद्देश आहे. गोदरेज अग्रोव्हेटचा सीएसआर उपक्रम म्हणून दिशा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.



### दिशा उपक्रमाद्वारे करिअरच्या संधी उपलब्ध करुन देणार

हा कार्यक्रम 'कॅम्पस-टू-कॉर्पोरेट फिनिशिंग स्कूल' म्हणून डिझाइन करण्यात आला आहे. कृषी आणि तत्सम शाखांमध्ये शिक्षण घेणा-या विद्यार्थिनींची रोजगारक्षमता वाढवणे हा याचा मुख्य उद्देश आहे. हा कार्यक्रम विक्री कौशल्ये, संवाद कौशल्ये आणि व्यावसायिक सज्जता यांसारख्या उद्योगासाठी आवश्यक असलेल्या कौशल्यांवर भर देतो. या उपक्रमांमुळे विद्यार्थिनींना औपचारिक करिअरमध्ये पाऊल ठेवणे सोपे होईल, असा कंपनीचा ठाम विश्वास आहे. 'वनएमएनबी फाऊंडेशन' आणि 'इक्का लर्निंग फाउंडेशन' यांच्या सहकार्याने राबवल्या जाणा-या या उपक्रमाने आतापर्यंत आंध्रप्रदेश, तेलंगणा आणि कर्नाटकमधीन २७६हून अधिक विद्यार्थिनींना प्रशिक्षित केले आहे. यातील अनेक विद्यार्थिनींनी नामांकित संस्थांमध्ये नोकरीच्या संधी मिळवल्या आहेत. महिलांना कृषी क्षेत्रात सक्षम करण्याच्या दिशेने ही कंपनीची महत्त्वपूर्ण कामगिरी समजली जाते. या कार्यक्रमाच्या अनावरणाप्रसंगी गोदरेज अग्रोव्हेटचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी सुनील कटारिया म्हणाले, "भारतातील कृषी आणि त्यासंबंधित संलग्न सर्व क्षेत्रे सध्या महत्त्वाच्या वळणावर आहेत. हे ध्यानात घेता शाश्वत वाढ, उत्पादकता आणि ग्रामीण समृद्धीला चालना देणे, हे आमचे उद्दिष्ट आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी उद्योगाच्या गरजांनुसार सक्षम मनुष्यबळ तयार करणे अत्यंत आवश्यक आहे. 'दिशा' कार्यक्रमाच्या माध्यमातून आम्ही कुशल महिला व्यावसायिकांची भक्कम फळी निर्माण करत आहोत. कृषी क्षेत्रातील महत्त्वाच्या पदांवर या महिला दैदिप्यमान कामगिरी करतील. आपल्या देशातील सुमारे ५० टक्के लोकसंख्या कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे. या क्षेत्राचे बळकटीकरण व्हावे, महिलांचा सहभाग वाढावा याकरिता आम्ही प्रयत्नशील आहोत."दिशा उपक्रमाबद्दल गोदरेज इंडस्ट्रीज ग्रुपच्या शाश्वतता आणि सीएसआर विभाग प्रमुख पाकजान दस्तूर म्हणाल्या, "गोदरेज इंडस्ट्रीज ग्रुपमध्ये सर्वसमावेशकता हा आमच्या प्रगतीचा आणि जडणघडणीचा मुख्य आधार आहे. 'दिशा' उपक्रम याच वचनबद्धतेचे प्रतिबिंब असून, याद्वारे आम्ही महिलांना संघटित कृषी उद्योगात सामील होण्यासाठी आणि रोजगाराच्या अर्थपूर्ण संधी मिळवण्यासाठी सक्षम करत आहोत. या प्रायोगिक प्रकल्पाने भागीदारीचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. या उपक्रमातील ३३ टक्क्यांहून अधिक महिलांनी कृषी उद्योगातील विविध पदांवर आपली जागा निश्चित केली आहे. याचा आम्हांला अभिमान वाटतो. भविष्यात ही संख्या वाढत जाईल, याची आम्हांला खात्री आहे."

या उपक्रमाबद्दल बोलताना गोदरेज अग्रोव्हेटच्या मुख्य मानव संसाधन अधिकारी मल्लिका मुत्रेजा म्हणाल्या, "कंपनीतील मनुष्यबळ भक्कम तसेच सर्वसमावेशक असावे याकरिता प्रत्येक टप्प्यावर सतत गुंतवणूक असावी लागते. आम्ही गोदरेज अग्रोव्हेटमध्ये करिअरच्या सुरुवातीपासून ते नेतृत्वाच्या पदांपर्यंत महिलांना सक्षम बनवण्यावर भर देतो. दिशा आणि भरतीविषयक आणि विकासाशी संबंधित अनेक कार्यक्रमांचे आयोजन हे आमच्या महिलांच्या करिअरचा अर्थपूर्ण मार्ग करण्याप्रती असलेली वचनबद्धता दर्शवतात.

आम्ही या प्रयत्नांतूनच भविष्यातील आव्हानांना तोंड देण्यासाठी सज्ज असलेले लवचिक कार्यपद्धतीचे मनुष्यबळ तयार करत आहोत. यामुळे कृषी विकासाला नवी दिशा मिळेल."

## मंत्र्यासोबत एकाच व्यक्तीला मंत्रिमंडळ सभागृहापर्यंत प्रवेश

**मुंबई (दै. संध्या) :**

मंत्रिमंडळ बैठकीच्या दिवशी मंत्रालयात उसळणाऱ्या कार्यकर्त्यांच्या आणि पदाधिकाऱ्यांच्या गर्दीवर अखेर मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी कडक निर्बंध लादत मंत्र्यांसोबत येणाऱ्या गर्दीला एक प्रकारे चाप लावला आहे. आता एका मंत्र्यासोबत त्यांच्या कार्यालयातील केवळ एका व्यक्तीलाच मंत्रिमंडळ सभागृहापर्यंत प्रवेश मिळणार आहे. याबाबतच्या सूचना सर्व मंत्री आणि विभागांनाही देण्यात आल्या आहेत.

मंत्र्यांची भेट घेणे, मतदारसंघातील प्रश्न मांडण्यासाठी कार्यकर्ते मंत्रिमंडळ बैठकीच्या दिवशी मंत्रालयात उपस्थित राहतात. बैठकीनंतर मंत्र्यांची भेट घेण्यासाठी कार्यकर्त्यांमध्ये चढाओढ असते. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व सर्व





मंत्री, राज्यमंत्री, मुख्य सचिव, अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव यांच्यासह प्रस्तावातील संबंधित विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित असतात. याव्यतिरिक्त इतरांनी मंत्रिमंडळ बैठकीत उपस्थित राहणे अभिप्रेत नाही. असे असले तरी मोठ्या प्रमाणावर शासकीय कर्मचाऱ्यांची आणि अभ्यागतांची उपस्थिती असल्याने कामकाजात अडथळा निर्माण होतो, असे मुख्य सचिवांनी पत्रात नमूद केले आहे.

## पर्यटकांची गाडी खोल दरीत कोसळली

**कोइम्बतूर (दै. संध्या) :**

तामिळनाडूतील वालपराई-पोल्लाची घाटात शुक्रवारी संध्याकाळी एक भीषण अपघात झाला. पर्यटकांची गाडी खोल दरीत कोसळल्याने केरळमधील ९ पर्यटकांचा जागीच मृत्यू झाला, तर चार जण गंभीर जखमी झाले आहेत. मृतांमध्ये मल्लापुरम जिल्ह्यातील एका सरकारी शाळेतील पाच शिक्षिकांचा समावेश आहे.

केरळच्या मल्लापुरम जिल्ह्यातील पेरिंथलमन्ना येथून १३ जण वालपराई येथे पर्यटनासाठी गेले होते. शुक्रवारी संध्याकाळी ५:१५ च्या सुमारास परतत असताना, घाटातील १३ व्या तीव्र वळणावर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. व्हॅन रस्त्यावरून घसरत दाट जंगलातून खाली कोसळली आणि नवव्या वळणाजवळ जाऊन थांबली. अपघात इतका भीषण होता की नऊ जणांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. या अपघातातील मृतांमध्ये पलपराम येथील शासकीय





प्राथमिक शाळेतील शिक्षिका आणि त्यांच्या नातेवाईकांचा समावेश आहे. अजिता (५४), रामला (५२), सुहरा (४३), आशा (४१), मजीथ (४३), सजिता (४५), शकीला (३७), रुकिया (३९) आणि हिशाम (१२), अशी मृतांची नावे आहेत.

घटनेची माहिती मिळताच वालपराईचे पोलीस उपअधीक्षक आणि अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेतली. दरी खोल आणि परिसर दुर्गम असल्याने बचावकार्यात मोठ्या अडचणी येत होत्या. मात्र, पोलिसांनी अथक प्रयत्नांनंतर जखमींना बाहेर काढून तातडीने पोल्लाची येथील सरकारी रुग्णालयात दाखल केले. जखमींमध्ये नौशाथ (३९), शहादिन (११), माइजिन (१०) आणि चालक मोहम्मद फासिथ (२१) यांचा समावेश असून, तिघांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना कोइम्बतूर मेडिकल कॉलेजमध्ये हलवण्यात आले आहे.

**पंतप्रधानांकडून शोक व्यक्त**

या घटनेनंतर कोइम्बतूरचे जिल्हाधिकारी पवनकुमार जी. गिरियप्पनवर यांनी अपघातस्थळाची पाहणी केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या घटनेबद्दल दुःख व्यक्त केले आहे. त्यांनी म्हटले की, "तामिळनाडूतील कोइम्बतूर येथे झालेला अपघात अत्यंत वेदनादायी आहे. आपल्या प्रियजनांना गमावलेल्या कुटुंबांच्या दुःखात मी सहभागी आहे. जखमींच्या प्रकृतीत लवकरात लवकर सुधारणा व्हावी, अशी मी प्रार्थना करतो."

## मतदानापूर्वी दोन दिवस आधी 'क्लीन चिट' मिळाली तरी देता येणार मत

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

पश्चिम बंगालमध्ये सुरू असलेल्या मतदार यादी पुनरीक्षण प्रक्रियेबाबत (SIR) सर्वोच्च न्यायालयाने एक मोठा आणि महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे. न्यायालयाने संविधानाच्या अनुच्छेद १४२ चा वापर करून हे सुनिश्चित केले आहे की, निवडणुकीच्या अगदी शेवटच्या टप्प्यापर्यंत अपील ट्रिब्यूनलकडून मंजुरी मिळवणाऱ्या व्यक्तींना मतदानाचा अधिकार दिला जाईल.


सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, ज्या लोकांच्या नावांना अपीलीय ट्रिब्यूनलकडून निवडणुकीच्या दोन दिवस आधीपर्यंत मंजुरी मिळेल, त्यांना आगामी पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत मतदान करण्याची परवानगी असेल. निवडणूक आयोगाला न्यायालयाने निर्देश दिले आहेत की, २१ एप्रिल किंवा २७ एप्रिल २०२६ पर्यंत



अपीलीय आदेशांची अंमलबजावणी करून एक पुरवणी सुधारित मतदार यादी जाहीर करावी, जेणेकरून पात्र नागरिक मतदानापासून वंचित राहणार नाहीत.

तसेच सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, ज्यांच्या अपीलांवर अद्याप निर्णय झालेला नाही, त्यांना केवळ अपील प्रलंबित आहे या कारणास्तव मतदानाचा अधिकार दिला जाणार नाही. म्हणजेच, अपील प्रक्रिया पूर्ण होणे अनिवार्य असेल. सुनावणी दरम्यान न्यायालयाने नमूद केले की, न्यायिक अधिकाऱ्यांनी केलेली ही संपूर्ण तपासणी प्रक्रिया अत्यंत आव्हानात्मक होती आणि कमी वेळेत ती पूर्ण करणे कठीण काम होते. तसेच, निवडणूक प्रक्रियेत अडथळा येऊ नये म्हणून अपीलीय स्तरावर हरकतींच्या माध्यमातून संपूर्ण प्रक्रिया पुन्हा सुरू करण्याचा प्रयत्न केला जाऊ नये, असा इशाराही न्यायालयाने दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या या आदेशावर प्रतिक्रिया देताना पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी म्हणाल्या की, सर्व नागरिकांनी आपल्या अधिकारांच्या पुनर्प्राप्तीसाठी ट्रिब्यूनलमध्ये अर्ज करावा. न्यायालयाच्या निर्णयानुसार पहिल्या टप्प्यासाठी २१ एप्रिल रोजी पुरवणी मतदार यादी प्रसिद्ध केली जाईल. या आधारावर त्यांचे कार्यकर्ते रात्रीपर्यंत फॉर्म भरून हे सुनिश्चित करतील की कोणताही पात्र व्यक्ती मतदानापासून वंचित राहणार नाही. दुसऱ्या टप्प्यातील निवडणुकीसाठी २७ एप्रिल रोजी आणखी एक पुरवणी यादी जाहीर केली जाईल, ज्या आधारावर २९ एप्रिल रोजी मतदान होईल.

## फिजिक्सवालाच्या विद्यार्थ्यांनी मिळवले अभूतपूर्व यश





**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

आजचा दिवस शिक्षण क्षेत्रातील कंपनी फिजिक्सवाला साठी उत्सवाचा ठरला, कारण सीबीएसई इयत्ता १० वी बोर्ड परीक्षा २०२६ मध्ये या संस्थेचे अनेक विद्यार्थी उच्च गुण मिळवून चमकले; यामध्ये १०० टक्के गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचाही समावेश होता. अव्वल कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये पंजाबमधील फाझिल्का येथील वैभव अरोरा, गुजरातच्या अहमदाबाद येथील अमोलिक पंडिता आणि ओडिशाच्या भुवनेश्वर येथील आयुषमान मोहपात्रा यांचा समावेश होता. या तिघांनीही १०० टक्के गुण मिळवून देशभरात अव्वल क्रमांक पटकावला. याव्यतिरिक्त, फिजिक्सवाला च्या तंत्रज्ञान-सज्ज ऑफलाइन केंद्रांपैकी एक असलेल्या ' फिजिक्सवाला विद्यापीठ'ने पुण्यात एका सत्कार समारंभाचे आयोजन केले होते. सीबीएसई इयत्ता १० वी बोर्ड परीक्षा २०२६ मध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शहरातील फिजिक्सवाला विद्यार्थ्यांचा या समारंभात सत्कार करण्यात आला.

## मतदानासाठी सक्ती करता येत नाही : सर्वोच्च न्यायालय

### मतदानासाठी केवळ जनजागृतीची गरज : सरन्यायाधीश

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

निवडणुकांमध्ये मतदान न करणाऱ्या नागरिकांवर दंड आकारण्याची मागणी करणारी जनहित याचिका गुरुवारी सर्वोच्च न्यायालयाने स्वीकारण्यास नकार दिला. भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती विपुल एम. पांचोली यांचा समावेश असलेल्या खंडपीठाने, अजय गोयल यांनी दाखल केलेली याचिका निकाली काढली.

गोयल यांनी आपल्या याचिकेत, मतदान न करणाऱ्यांवर सरकारी लाभांपासून



वंचित ठेवण्यासारख्या परिणामांची मागणी केली होती. सुनावणीदरम्यान, न्यायालयाने सक्तीचे मतदान लागू करण्याच्या व्यवहार्यतेबद्दल आणि घटनात्मकतेबद्दल शंका व्यक्त केल्या. मतदानात सहभाग अनिवार्य करण्यातील व्यावहारिक अडचणींवर त्यांनी भर दिला आणि नमूद केले की, विविध सामाजिक-आर्थिक परिस्थिती असलेल्या देशात अशी सक्ती करणे अवास्तव ठरेल.

हा मुद्दा स्पष्ट करताना, न्यायालयाने निरीक्षण नोंदवले की, अगदी न्यायव्यवस्थेतील सदस्यांनाही (न्यायाधीशांनाही) प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या अडचणींना सामोरे जावे लागू शकते. "जर ही मागणी मान्य केली, तर माझे सहकारी न्यायमूर्ती बागची यांना पश्चिम बंगालला जाऊन मतदान करावे लागेल, जरी तो कामकाजाचा दिवस असला तरी," असे सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी म्हटले.


मतदान न करण्याचा निर्णय घेणाऱ्यांवर दंड लादण्याच्या संभाव्य परिणामांबद्दलही खंडपीठाने प्रश्न उपस्थित केले. मतदानासाठी केवळ जनजागृतीची गरज आहे. पण आपण सक्ती करू शकत नाही, असे सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी नमूद केले. "जर एखादी गरीब व्यक्ती म्हणाली की, 'मला माझ्या रोजगारासाठी (मजुरीसाठी) काम करावे लागेल, मग मी मतदान कसे करू?', तर आपण त्याला काय उत्तर द्यावे?" असा सवाल सरन्यायाधीशांनी केला.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### मावळमध्ये एमआयडीसीला ग्रामस्थांचा विरोध; जमीन संपादनावर ठाम भूमिका

पिंपरी (दैनिक संध्या) : मावळ तालुक्यातील करुंज व बऊर ग्रामपंचायत तसेच बाह्मणवाडी परिसरात आयोजित विशेष ग्रामसभांमध्ये प्रस्तावित एमआयडीसी स्थापन करण्यासाठी करण्यात येणाऱ्या जमीन संपादनास ग्रामस्थांनी एकमुखाने विरोध दर्शविला. सभांमध्ये शेतकऱ्यांच्या अडचणी व मागण्यांवर चर्चा झाली. ठरावानुसार, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून (एमआयडीसी) शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करू नयेत, अशी भूमिका घेण्यात आली. शेतकर्यांना देण्यात येणाऱ्या नोटीस मागे घेण्याची मागणी करण्यात आली. 2006 पासून या भागातील जमिनीवर विविध शिक्के मारण्यात आले. त्याचा शेतकऱ्यांवर मोठा परिणाम झाला. अल्पभूधारक शेतकऱ्यांचे क्षेत्र एमआयडीसीमध्ये समाविष्ट करू नये, संपादित होणाऱ्या क्षेत्रातील बागायती जमिनींची प्रत्यक्ष पाहणी करावी. याशिवाय 1995-96 दरम्यान द्रुतगतीमार्गासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी आधीच संपादित झालेल्या आहेत. उर्वरित जमिनीवरच त्यांचा उदरनिर्वाह सुरू असून, त्यादेखील संपादित झाल्यास शेतकरी भूमिहीन होण्याची भीती व्यक्त करण्यात आली. करुंज, बऊर, राऊतवाडी व लोखंडवाडी परिसरातील ग्रामस्थांनी या एमआयडीसी प्रकल्पाला तीव विरोध दर्शवित प्रकल्प रद्द करण्याची मागणी केली. प्रस्तावित एमआयडीसी क्षेत्रात मागील 30-40 वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या शेतकऱ्यांचे संसार उद्ध्वस्त होण्याची शक्यता असल्याचेही सभेत नमूद करण्यात आले.



### पिंपरी-चिंचवडमध्ये तापमान 40 अंशांवर; उकाड्याने नागरिक हैराण

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड शहर परिसरातील वातावरणात उष्मा मोठ्या प्रमाणात वाढला असून, तापमानाची नोंद 39 अंश सेल्सिअस झाली आहे. त्यामुळे दिवसेंदिवस उकाड्यात वाढ होत आहे. नागरिकांना उकाड्यातून काही दिलासा मिळत नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. शुक्रवार (दि. 17) तर तापमानाने उच्चांक गाठला असून, शहरात 40 अंश तापमानाची नोंद झाली आहे. गेले आठ दिवसांपासून तापमानाचा पारा 37 अंशाच्या पुढे जात आहे. उष्णतेमुळे तापमानात वाढ होऊन अंगाची लाहीलाही होत आहे. उन्हात फिरणाऱ्या नागरिकांना डोकेदुखी, चक्कर, मळमळ आणि उलटीचे त्रास जाणवत आहेत. उन्हापासून संरक्षण म्हणून टोपी, छत्री, गॉगल घेतले तरी उन्हाचे चटके जाणवत आहेत. शहरातील प्रमुख वर्दळीच्या रस्त्यांवर दुपारी शुकशुकाट जाणवत आहे. वाढलेल्या तापमानामुळे फॅनची हवादेखील गरम जाणवत आहे. दिवसा अन रात्रीही घामाघूम झालेले नागरिक थंडावा मिळविण्याचा प्रयत्न करत आहेत. नागरिकांनी उष्माघात आणि उन्हापासून होणाऱ्या इतर विकारापासून काळजी घेण्याचे आवाहन वैद्यकीय तज्ज्ञांकडून करण्यात येत आहे. वाढत्या तापमानात कष्टाची कामे करणे टाळावे, उन्हाळ्यात दुपारी फिरणे टाळावे, शेतातील, रस्त्यांची कामे सकाळी लवकर करावी, उन्हात काम करणे किंवा बाहेर पडणे आवश्यक असेल तर डोक्यावर व कानावर पांढरे कापड किंवा टोपी घालून, डोळ्याला गॉगल लावूनच जावे, उन्हाळ्यात रंगीत कपडे अथवा विविध रंगाची वस्त्रे वापरू नये, पांढरी सैल वस्त्रे वापरावीत, उन्हाळ्यात शरीरातून निघणाऱ्या घामामुळे खूप थकवा जाणवतो हे लक्षात घेऊन उन्हाळ्यात भरपूर पाणी प्यावे, रसाळ फळांच्या सेवनाला प्राधान्य द्यावे, काकडी, आंबे, चिकू, टरबूज, कलिंगडे या फळांचा जास्त वापर करावा. लिंबू सरबत, ताक, दही, लस्सी, उसाचा रस अशा थंडपेयांचे सेवन करावे.



### पिंपरी-चिंचवडमध्ये मालमत्ताकरात बदल; ‘अ-ब’ वर्गवारीमुळे उत्पन्नात वाढ

पिंपरी (दैनिक संध्या) : शहरात निवासी व बिगरनिवासी मालमत्ताचे तीनऐवजी केवळ अ आणि ब असे दोनच विभाग असणार आहेत. या दोन विभागात संपूर्ण शहरातील भाग विभागला जाणार आहे. त्यामुळे मालमत्ताकर वसुलीत सुसूत्रता येणार असून, महापालिकेच्या उत्पन्नात दरवर्षी सुमारे 50 कोटी रुपयांची वाढ होईल, असा दावा प्रशासनाने केला आहे. शहरात निवासी, औद्योगिक, मोकळ्या जमीन अशा 7 लाख 84 हजार 420 मालमत्तांची महापालिकेकडे नोंद आहे. विविध गावे मिळून पिंपरी-चिंचवड शहराची निर्मिती झाली आहे. नागरिकांना मूलभूत व पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी सन 1982 मध्ये महापालिका अस्तित्वात आली. त्यानंतर साधारण तीन टप्प्यांत लगतच्या गावांचा समावेश झाला. तसेच, झोपडपट्ट्या, चाळी, बैठी घरे, जुन्या इमारती, हाऊसिंग सोसायट्या, समाविष्ट गावे, त्यांचा विकास झाल्यानंतरची बांधकामे वाढली. त्या सर्व मालमत्तांना पालिकेच्या वतीने मालमत्ताकराची आकारणी केली जाते. ही कर आकारणी गेल्या अनेक वर्षांपासूनच केली जात असताना यासाठी शहरात भागांची अ, ब आणि क अशी वर्गवारी आहे. मात्र, सध्यस्थितीत शहरातील ब आणि क या वर्गातील भागामध्ये झपाट्याने विकास झाला आहे. त्यामुळे या भागातील मालमत्तांना कमी दराने मालमत्ताकर आकारणी होत होती. याचा विचार करून महापालिकेने आता वर्गवारीमध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबतचा प्रस्ताव सोमवारी (दि. 20) होणाऱ्या महापालिका सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीसाठी ठेवण्यात आला आहे. अ विभाग : निगडी प्राधिकरण, आकुर्डी, चिंचवड, सांगवी, पिंपरी वाघेरे, पिंपरी कॅम्प, महापालिका भवन, फुगेवाडी, दापोडी, भोसरी या करसंकलन विभागीय कार्यालयातील सर्व समाविष्ट आणि 1997 मध्ये समाविष्ट थेरगावचा भाग. ब विभाग : थेरगाव कार्यालयांतर्गत भूजबळवस्ती, वाकडकरवस्ती, भूमकरवस्ती; दिघी बोपखेल कार्यालयांतर्गत साईपार्क, आदर्शनगर, दिघी गावठाण परिसर.

# 30 जूनपर्यंत मालमत्ताकर सवलत; 16 प्रकारच्या सवलतींची घोषणा

## ऑनलाइन भरण्यावर अतिरिक्त सवलत; महिलांपासून दिव्यांगांपर्यंत विविध घटकांना मोठा दिलासा

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड महापालिकेचा मालमत्ताकर 30 जूनपर्यंत भरल्यास सामान्यकरात सवलत दिली जाणार आहे. या सवलत योजनेंतर्गत नागरिकांना एकूण 16 प्रकारच्या सवलतींचा लाभ मिळणार आहे. मालमत्ताधारकांनी मालमत्ताकर भरून सवलतींचा लाभ घ्यावा, असे आवाहन महापालिकेने केले आहे.



सन 2026-26 या चालू वर्षाच्या सामान्यकरावर 5 टक्के सवलत देण्यात आली आहे. ऑनलाइन माध्यमातून मालमत्ताकर भरणाऱ्या करदात्यांना अतिरिक्त 5 टक्के सवलत आहे. ही योजना 30 जूनपर्यंत लागू राहणार आहे. कर भरण्याची प्रक्रिया सुलभ, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख करण्यासाठी ऑनलाइन कर भरण्याची सुविधा आहे. नागरिकांना घरबसल्या कर भरणा करता येत असून, वेळेची बचत होत आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही आगाऊ मालमत्ताकर भरणाऱ्या नागरिकांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध सवलती जाहीर करण्यात आल्या आहे. त्या सवलतींचा जास्तीत जास्त लाभ घेण्यासाठी नागरिकांनी 30 जूनपूर्वी कर भरणा करावा, असे आवाहन महापौर रवी लांडगे यांनी केले आहे.

**..या आहेत प्रमुख सवलती**

30 जूनअखेर मालमत्ताकराची रक्कम भरल्यास 5 टक्के सामान्यकरात सूट. ऑनलाइन स्वरूपात कराचा भरणा केल्यास 5 टक्के सामान्य करात सूट. फक्त महिलांच्या नावे असलेल्या एका निवासी मालमत्तेच्या सामान्यकरावर तब्बल 30 टक्के सामान्यकरात सूट. दिव्यांग व्यक्तीच्या एका मालमत्तेच्या सामान्यकरावर 50 टक्के सामान्य करात सूट.

स्वातंत्र्यसैनिक किंवा त्यांच्या पत्नीच्या नावावर असलेल्या एका मालमत्तेवर 50 टक्के सामान्यकरात सूट. हाऊसिंग सोसायटीच्या आवारात कंपोस्टिंग यंत्रणा सुरू असल्यास 5 टक्के सामान्यकरात सूट. एसटीपी प्लांट सुरू असल्यास 3 टक्के सामान्यकरात सूट. कंपोस्टिंग यंत्रणा व एसटीपी प्लांट सुरू असल्यास 8 टक्के सामान्यकरात सूट. झिरो वेस्ट संकल्पना राबविल्यास 8 टक्के सामान्यकरात सूट.

झिरो वेस्ट व एसटीपी प्लांट सुरू असल्यास 10 टक्के सामान्यकरात सूट. शैक्षणिक इमारतींना कंपोस्टिंगसाठी 4 टक्के, झिरो वेस्टसाठी 4 टक्के, झिरोवेस्ट व रेनवॉटर हार्वेस्टिंगसाठी 8 टक्के, झिरोवेस्ट व सौर ऊर्जेसाठी 9 टक्के, झिरोवेस्ट, रेनवॉटर हार्वेस्टिंग व सौर ऊर्जेसाठी 10 टक्के सूट.

करदात्यांना प्रोत्साहन देण्यासाठी यंदा विविध सवलती जाहीर करण्यात आल्या आहेत. या सवलतींचा लाभ घेण्यासाठी नागरिकांनी निश्चित कालावधीत कर भरणा करणे आवश्यक आहे. वेळेत कर भरल्यामुळे आर्थिक सवलत मिळण्यासोबतच शहरातील सेवा अधिक प्रभावीपणे राबविण्यास मदत होते. त्यामुळे नागरिकांनी मालमत्ताकर भरून सवलतींचा लाभ घ्यावा, असे आवाहन करसंकलन विभागाचे उपायुक्त सचिन पवार यांनी केले आहे.

# कृष्णा चौक परिसरात रोहित्राला भीषण आग

## अनधिकृत टपऱ्यांमुळे आगीला वाढलेले स्वरूप; सुदैवाने जीवितहानी टळली

**पिंपळे गुरव (दै. संध्या)**

नवी सांगवीतील कृष्णा चौक ते एम. एस. काटे चौक मार्गावर मंगळवारी रात्री रोहित्राला अचानक आग लागली होती. यामध्ये ज्ञानेश पार्कजवळील महावितरणचे रोहित्र भीषण आगीत खाक झाले. यामध्ये सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी परिसरातील अनधिकृत टपऱ्या आणि हातगाड्यांच्या अतिक्रमणाचा गंभीर मुद्दा पुन्हा समोर आला आहे.



**टपऱ्यांमधील सिलिंडर काढले बाहेर**

रोहित्राच्या अगदी जवळ उभ्या असलेल्या तीन अनधिकृत टपऱ्यांनी या आगीला अधिकच खतपाणी घातले. अतिक्रमणाच्या विळख्यात अडकलेल्या या रोहित्रामुळे आग वेगाने पसरली आणि परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाण्याची भीती निर्माण झाली. या टपऱ्यांपैकी एका ठिकाणी असलेला गॅस सिलिंडर वेळीच बाहेर काढण्यात आल्याने मोठा अनर्थ टळला.

**वीजपुरवठा केला खंडित**

घटनेची माहिती मिळताच अग्निशामक दलाने तातडीने धाव घेत आगीवर नियंत्रण मिळवले. तर, महावितरण अधिकाऱ्यांनी वीजपुरवठा खंडित करून पुढील धोका रोखला. मात्र, आगीचे नेमके कारण अद्याप अस्पष्ट असले तरी रोहित्र आणि डीपी बॉक्सच्या अगदी शेजारीच बिनधास्त उभ्या राहिलेल्या शेडच्या अतिक्रमणांनीच या घटनेला भीषण रूप दिल्याचे स्पष्ट झाले आहे.

# कुंडमळा येथे इंद्रायणी नदीत बुडून तरुणाचा मृत्यू

**पिंपरी (दै. संध्या)**

तळेगाव दाभाडेजवळील कुंडमळा येथे मित्रांसमवेत फिरण्यासाठी आलेल्या एका तरुणाचा इंद्रायणी नदीत पोहताना पाण्याचा अंदाज न आल्याने बुडून मृत्यू झाला. ही घटना शुक्रवार (दि. 17) सायंकाळी पाचच्या सुमारास घडली. प्रथमेश लोणारी (24, रा. मांजरी खुर्द) असे मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे. तळेगाव एमआयडीसी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक संतोष पाटील यांनी याबाबत माहिती दिली.

प्रथमेश हा चार ते पाच मित्रांसमवेत कुंडमळा येथे फिरण्यासाठी आला होता. सायंकाळी सर्वजण इंद्रायणी नदीत पोहण्यासाठी उतरले. मात्र, पाण्याची खोली व प्रवाहाचा अंदाज न आल्याने प्रथमेश पाण्यात बुडाला. त्याच्या मित्रांनी तत्काळ आरडाओरडा करत मदतीसाठी धाव घेतली.

सागर भेगडे यांनी तातडीने ‘वन्यजीव रक्षक मावळ’ संस्था व ‘शिवदुर्ग मित्र, लोणावळा’ या बचाव पथकांना माहिती दिली. काही वेळातच रेस्क्यू टीम घटनास्थळी दाखल होऊन शोधमोहीम सुरू केली. अवघ्या पाच ते दहा मिनिटांत प्रथमेशला पाण्यातून बाहेर काढण्यात आले. त्याला तातडीने तळेगाव दाभाडे येथील जनरल हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. मात्र, उपचारापूर्वीच डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. या शोधमोहिमेत वन्यजीव रक्षक व शिवदुर्ग संस्थेचे निलेश गराडे, भास्कर माळी, रवी कोळी, विराज गराडे, विनय सावंत, शाहरुख सय्यद, राजू सय्यद, सागर भेगडे, कुंदन भोसले आदींनी सहभाग घेतला.

# पिंपरी-चिंचवड आरटीओ परिसरात अवैध प्रकारांचा सुळसुळाट

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालय परिसरात दिवसेंदिवस वाढत चाललेल्या अवैध प्रकारांमुळे नागरिकांमध्ये नाराजी पसरली आहे. एजंटांचा उघडपणे सुरू असलेला वावर, गुटखा आणि सिगारेटची सर्रास विक्री, तसेच रस्त्यांवर अतिक्रमण करून उभारलेली दुकाने यामुळे संपूर्ण परिसराला अव्यवस्थेचे ग्राहण लागले आहे. या सगळ्या प्रकारांमुळे वाहनचालक आणि नागरिक अक्षरशः हैराण झाले असून, प्रशासन मात्र या परिस्थितीकडे दुर्लक्ष करत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

आरटीओ कार्यालयात अधिकृत कामे सहज आणि पारदर्शक पद्धतीने व्हावीत, अशी अपेक्षा असते. मात्र, प्रत्यक्षात एजंटांची चलती दिसून येते. कार्यालयाबाहेरच एजंटांची गर्दी दिसून येते. नागरिकांना फसवून जादा पैसे उकळण्याचे प्रकार असल्याने सर्वसामान्य नागरिकांना आर्थिक आणि मानसिक त्रास सहन करावा लागतो. या सर्व प्रकारांबाबत वाहतूक विभाग, महापालिका आणि संबंधित प्रशासन यांची भूमिका संशयास्पद वाटते. अवैध विक्रेत्यांवर नियंत्रण नाही, एजंटांच्या कारवायांकडे दुर्लक्ष केले जात असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये 99 सोसायट्यांचे एसटीपी बंद

## नळजोड तोडणे, दंड आणि फौजदारी कारवाईचा इशारा; पाण्याच्या टंचाईच्या पार्श्वभूमीवर निर्णय

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड शहरातील शंभरहून अधिक सदनिका असलेल्या हाऊसिंग सोसायट्यांना मैलासांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी) सुरू करण्याबाबत महापालिकेने अनेकदा नोटिसा बजावल्या आहेत. तरीही, तब्बल 99 सोसायट्यांमधील एसटीपी बंद स्थितीत आहेत. विविध कारणे पुढे करून एसटीपी बंद ठेवला जात आहे. एसटीपी सुरू न करणाऱ्या सोसायट्यांचा नळजोड तोडण्याचा तसेच, दंडात्मक व फौजदारी कारवाई करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

पिंपरी-चिंचवड शहर चारही बाजूने विस्तारत असून लोकसंख्याही झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे पाण्याची मागणीही वाढू लागली आहे. सध्या शहरवासीयांना 650 एमएलडी पाणी एका दिवसाला दिले जात आहे. मात्र, त्यानंतरही शहरातील अनेक मोठ्या हाऊसिंग सोसायट्यांना खासगी टँकरच्या पाण्याचा आधार घ्यावा लागत आहे. वाढत्या उन्हामुळे बोरवेल व विहिरी कोरड्या पडल्या आहेत. पाण्याच्या तक्रारींमध्ये वाढ झाली आहे. विस्कळीत, अपुरा, दूषित व कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारींचा पाऊस सारथी हेल्पलाइनवर पडत आहे. त्यातून महापालिकेने एसटीपी बंद असलेल्या सोसायट्यांवर कारवाईचा बडगा उगारण्यास सुरुवात केली आहे.

महापालिकेने शहरातील मोठ्या हाऊसिंग सोसायटीचे सर्वेक्षण केले आहे. त्यात अनेक सोसायट्यांचे एसटीपी सुरू नसल्याचे आढळून आले आहे. तर, काही एसटीपी केवळ नावापुरते आहेत. काही सोसायटीचे सांडपाणी थेट महापालिकेच्या ड्रेनेजलाईन किंवा नाल्यात सोडले जाते. तर, काही सोसायटीत महापालिकेच्या पथकास प्रवेश दिला गेला नाही. पोलिस बंदोबस्त मिळाल्यानंतर त्या सोसायट्यांनी प्रवेश दिला. एसटीपी सुरू न ठेवल्याने महापालिकेने त्या सोसायट्यांवर कारवाईचा बडगा उगारला आहे. प्रथम दंडात्मक कारवाई केली जाणार आहे. त्यानंतर महापालिकेच्या पिण्याचा पाण्याचा नळजोड तोडला जाणार आहे. त्यानंतर थेट फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येणार आहे.

# विद्यार्थ्यांनी देशासाठी अर्थपूर्ण योगदान द्यावे - पीसीयू कुलगुरू डॉ. सोनावणे

## टीएमपीव्हीएल व पीसीयू मेकॅट्रॉनिक्स प्रोग्रामच्या पहिल्या तुकडीचे स्वागत

**पिंपरी (दै. संध्या)**

नवीन तंत्रज्ञानातून मिळणाऱ्या ज्ञानाचा वापर जबाबदारीने केला पाहिजे. शिक्षण वर्ग खोल्यांपुरते मर्यादित न राहता सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनामध्ये परिवर्तन घडवण्याचे साधन बनले पाहिजे. यातून विद्यार्थ्यांनी देशासाठी अर्थपूर्ण योगदान द्यावे असे प्रतिपादन पीसीयू कुलगुरू डॉ. संतोष सोनावणे यांनी केले.





पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या साते, वडगाव मावळ येथील पिंपरी चिंचवड विद्यापीठ आणि टाटा मोटर्स पॅसेंजर व्हेईकल लिमिटेड (टीएमपीव्हीएल) यांच्या संयुक्त सहयोगाने कौशल्य आणि नॅशनल अप्रेंटिसशिप प्रमोशन स्कीम (एनएपीएस) अंतर्गत मेकॅट्रॉनिक्स अभियांत्रिकी सर्टिफिकेट व डिप्लोमा प्रोग्रामच्या पहिल्या तुकडीचे उद्धघटन आणि स्वागत करण्यात आले.

यावेळी टाटा मोटर्सचे वरिष्ठ अधिकारी प्लांट हेड नीरज अग्रवाल, एचआर हेड विवेक बिंद्रा, कॉर्पोरेट लर्निंग अँड डेव्हलपमेंट हेड डॉ. रंगा गुंटी, आणि ईआर हेड संतोष बढे, प्र-कुलगुरू डॉ. सुदीप थेपडे, प्रोग्रामचे हेड डॉ. उमेश पोतदार, डॉ. अमित पाटील (डीन, स्कूल ऑफ मॅनेजमेंट), डॉ. विजय पाटील (डीन, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विभाग), डॉ. अभिजीत बनुबाकोडे (डायरेक्टर, कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग), डॉ. भारत काळे (डायरेक्टर, संशोधन व विकास), डॉ. कमलेश मेश्राम (हेड, स्कूल ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन्स), डॉ. नीरू मलिक (असोसिएट डायरेक्टर, सेंटर ऑफ इनोव्हेशन अँड एंटरप्रेन्योरशिप), डॉ. पल्लवी आहिरे, डॉ. प्रणव चरखा, डॉ. सतपालसिंग राजपूत, डॉ. शंकर देवसरकर, डॉ. स्वाती शिर्के, डॉ. रामदास बिरादार, आदी उपस्थित होते.

पीसीइटी विश्वस्त तथा पीसीयू कुलपती हर्षवर्धन पाटील, पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, व्यवस्थापन समिती सदस्य व उद्योजक अजिंक्य काळभोर व नरेंद्र लांडगे, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी यशस्वी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

टाटा मोटर्सचे प्लांट हेड नीरज अग्रवाल यांनी सांगितले की, या संयुक्त उपक्रमामुळे उद्योग व शैक्षणिक संस्था सहकार्य वाढून विद्यार्थ्यांना उद्योजक बनविण्यात महत्त्वाची भूमिका बजावता येईल. यात सहभागी असलेल्या विद्यार्थ्यांचे शिक्षण केवळ सैद्धांतिक न राहता प्रत्यक्ष अनुभव, शिस्त आणि नवोन्मेष यांद्वारे समृद्ध होईल. यामुळे कुशल तांत्रिक मनुष्यबळ विकसित होऊन भविष्यात सक्षम व्यावसायिक घडतील असा विश्वास आहे.

प्रोग्रामचे हेड डॉ. उमेश पोतदार यांनी सांगितले की, वर्गातील शिक्षण आणि प्रत्यक्ष औद्योगिक अनुभव यांचे प्रभावी एकत्रीकरण करून हे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहे. त्यांना शिकण्याची, काम करण्याची आणि या माध्यमातून आयुष्य बदलण्याची संधी उपलब्ध झाली आहे. हे विद्यार्थी दर्जेदार शिक्षण आणि औद्योगिक, व्यावहारिक अनुभव घेऊन सक्षम बनतील. प्राध्यापकांनी अत्याधुनिक असेंब्ली लाईन्स, रोबोटिक ऑटोमेशन आणि महिला नेतृत्वाखाली सुरू असलेल्या उत्पादन विभागास भेट देऊन माहिती घेतली.

स्किल डेव्हलपमेंट हेड शशिकांत रोडे यांनी टाटा मोटर्स प्लांटचा इतिहास, सध्याचे उपक्रम आणि भविष्यातील दृष्टीकोन याबद्दल माहिती दिली. सुत्र संचालन पूनम बोरले यांनी केले.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### सीबीएसई परीक्षेत रिया हाडवळे प्रथम

नारायणगाव (दैनिक संध्या) : मॉडर्न इंग्लिश स्कूल बेल्हे (ता. जुन्नर) इयत्ता १० वी सीबीएसई बोर्डचा शैक्षणीक वर्ष २०२५-२६ चा निकाल १०० टक्के लागला असून सलग ११ वर्ष १०० टक्के निकालाची परंपरा कायम राहिली असल्याची माहिती प्राचार्या विद्या गाडगे यांनी दिली. प्रथम क्रमांक रिया प्रवीण हाडवळे (९२.४० टक्के), द्वितीय भारती समर्थ दत्तात्रय (८९.४०), तृतीय क्रमांक चौरे नीरज जयराम (८७.२०) याने पटकावला आहे. उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सीए सावकार गुंजाळ, अध्यक्ष गोपीनाथ शिंदे, सीईओ शैलेश ढवळे, विश्वस्त दावला कणसे,सर्व संचालक मंडळ, प्राचार्या विद्या गाडगे, उपप्राचार्य के.पी.सिंग, शिक्षक व पालकांनी अभिनंदन केले.

### तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी हितेंद्र गद्रे यांची निवड

नारायणगाव (दैनिक संध्या) : दौंड तालुका पत्रकार संघाच्या नवनिर्वाचित कार्यकारिणीची घोषणा नुकतीच करण्यात आली असून अध्यक्षपदी हितेंद्र गद्रे यांची बिनविरोध निवड झाली आहे. उपाध्यक्षपदी मनोज खंडागळे तर पूर्व उपाध्यक्षपदी अमरसिंग परदेशी यांचीही बिनविरोध निवड झाली. संघाच्या सचिवपदी बापू नवले, सहसचिवपदी गणेश आनंदा सुळ आणि कोषाध्यक्षपदी मंगेश पायगुडे यांची निवड झाली आहे. सदस्य म्हणून ज्येष्ठ पत्रकार एम. जी. शेलार, त्रिभुज शेळके, गणेश चोपडे जीवन शेंडकर,गणेश बाजीराव सुळ यांचा समावेश करण्यात आला आहे. याशिवाय, सल्लागारपदी राजू दत्तात्रेय जगदाळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हा प्रतिनिधी म्हणून रवींद्र खोरकर यांची निवड झाली असून पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीच्या जबाबदारीसाठी दीपक देशमुख यांची निवड करण्यात आली आहे. निमंत्रक म्हणून सतीश गुंदेचा कार्य पाहणार आहेत. कार्यक्रमादरम्यान ज्येष्ठ पत्रकार वसंत कदम व आशा भोसले यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. प्रकाश शेलार यांनी सूत्रसंचालन केले, तर ज्येष्ठ पत्रकार रमेश वत्रे यांनी आभार मानले. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून रवी पाटील आणि सुनील भांडवलकर यांनी कामकाज पाहिले. नवीन कार्यकारिणीच्या माध्यमातून तालुक्यातील पत्रकारांच्या विविध प्रश्नांना अधिक प्रभावीपणे न्याय मिळवून देण्याचा तसेच पत्रकार बांधवांचे संघटन अधिक मजबूत करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. दरम्यान, विविध स्तरांतून नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. दौंड पंचायत समितीचे सभापती सुखदेव चोरमले यांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सन्मान केला.

### उष्णतेच्या लाटेमुळे सासवडमधील 'पुरंदर अ‍ॅग्रो एक्स्पो'च्या तारखेत बदल

सासवड (दैनिक संध्या) : पुरंदर तालुक्यातील शेतकऱ्यांना जागतिक बाजारपेठ आणि आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या 'पुरंदर अ‍ॅग्रो एक्स्पो' या कृषी व पशू प्रदर्शनाच्या तारखांमध्ये बदल करण्यात आला आहे. हवामान विभागाने मे महिन्याच्या सुरुवातीला उष्णतेच्या लाटेचा इशारा दिल्याने, शेतकऱ्यांची गैरसोय टाळण्यासाठी हे प्रदर्शन आता १ ते ४ मे ऐवजी २२ ते २५ मे या कालावधीत सासवड (ता.पुरंदर) येथील श्री शिवाजी इंग्लिश मीडियम स्कूलच्या परीसरात भरवण्यात येणार आहे. माजी आमदार संजय जगताप यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली आहे. कोरोना काळानंतर प्रदीर्घ विरामानंतर हे प्रदर्शन पुन्हा एकदा मोठ्या स्वरूपात आयोजित केले जात आहे. शेतीतील वाढता उत्पादन खर्च कमी करणे आणि उत्पादकता वाढवणे हा या प्रदर्शनाचा मुख्य उद्देश आहे. यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून कमी खर्चात जास्त उत्पादन कसे घ्यावे, याचे थेट मार्गदर्शन शेतकऱ्यांना अनुभवी तज्ज्ञांकडून मिळणार आहे. विशेषतः मजूर टंचाईवर मात करण्यासाठी उपयुक्त ठरणारी आधुनिक कृषी यंत्रे, हरितगृह तंत्रज्ञान, मशरूम उत्पादन आणि कोल्ड स्टोअरेज क्षेत्रातील नामवंत कंपन्या आपली उत्पादने येथे सादर करणार आहेत. शरद कृषी व पर्यावरण विकास प्रतिष्ठानच्या माध्यमातून पुरंदर तालुक्यात झालेल्या व्यापक जलसंधारणाच्या कामांमुळे भूजल पातळीत मोठी वाढ झाली आहे. या उपलब्ध पाण्याचा उपसा न करता त्याचा योग्य आणि काटकसरीने वापर करण्यासाठी शेतकऱ्यांना सेंद्रिय शेती आणि ठिबक सिंचनाचे विशेष प्रशिक्षण या एक्स्पोमध्ये दिले जाणार आहे. त्याचबरोबर पशुंचे आहार व रोग याविषयी मार्गदर्शन तसेच पशुपालन, कुक्कुटपालन आणि प्रक्रिया उद्योगातील नवनवीन संधींची माहिती देऊन तरुणांना शेतीपूरक व्यवसायांकडे आकर्षित करण्याचा संयोजकांचा प्रयत्न आहे. या चार दिवसीय प्रदर्शनात राष्ट्रीय आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांचे प्रतिनिधी प्रत्यक्ष उपस्थित राहून सुधारित बी-बियाणे, खते आणि कीटकनाशकांबाबत सविस्तर मार्गदर्शन करतील. तसेच ग्रामीण भागातील आर्थिक सक्षमीकरणासाठी शेतकरी बचत गट आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या स्थापनेसाठी तज्ज्ञांचा विशेष सल्ला दिला जाणार आहे. तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांनी सुधारित तारखांची नोंद घेऊन या संधीचा लाभ घ्यावा आणि आपले शेतीविषयक ज्ञान अद्ययावत करावे, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

### प्रभाग समिती निवडणुकीत भाजप-राष्ट्रवादी एकत्र; काँग्रेसला धक्का


पुणे (दैनिक संध्या) : प्रभाग समित्यांच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत सत्ताधारी भाजपने पुन्हा एकदा राष्ट्रवादी काँग्रेसला गुंडाळले आहे. क्षेत्रीय कार्यालयांच्या पुनर्रचनेवरून या दोन्ही पक्षांत मतभेद झाले असतानाही भाजपने राष्ट्रवादीला एका प्रभाग समितीचे अध्यक्षपद वर्षभरासाठी देऊन या निवडणुकीत राष्ट्रवादीला बरोबर घेऊन काँग्रेसला धक्का दिला आहे. महापालिकेच्या 15 क्षेत्रीय कार्यालयांच्या प्रभाग समिती अध्यक्षपदासाठी दि. 21 एप्रिलला निवडणूक होणार आहे. त्यासाठी शुक्रवारी अर्ज दाखल करण्यात आले. दरम्यान, क्षेत्रीय कार्यालयांची पुनर्रचना करताना राष्ट्रवादीला प्रभाग समितीचे अध्यक्षपद मिळू नये, यासाठी भाजपने प्रशासकीय रचनेत हस्तक्षेप करीत प्रभाग क्र. 1 व 2 नगर रस्ता लोहगाव क्षेत्रीय कार्यालयाला जोडले. त्यामुळे येरवडा वडगाव शेरी क्षेत्रीय कार्यालयाच्या अध्यक्षपदापासून राष्ट्रवादीला वंचित राहावे लागले आहे. या रचनेची उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तक्रार केली आहे. या तक्रारीची दखल घेत नगरविकास विभागाने महापालिकेकडून अहवाल मागविला आहे. त्यानंतर अद्याप ही रचना दुरुस्त करण्याची कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे प्रभाग समितीच्या निवडणुकीत राष्ट्रवादीने काँग्रेसला साथ देण्याचा निर्णय घेतला होता. राष्ट्रवादीच्या या भूमिकेमुळे ढोले पाटील रोड क्षेत्रीय कार्यालयाच्या प्रभाग समितीच्या अध्यक्षपदासाठी काँग्रेस व राष्ट्रवादी यांची प्रत्येकी चार व भाजपची चार, असे संख्याबळ होऊन अध्यक्षपद थेट चिठ्ठीवर निवडण्याची वेळ आली असती. भाजपने हा धोका लक्षात घेऊन थेट राष्ट्रवादीची मनधरणी केली तसेच या क्षेत्रीय कार्यालयाचे पहिल्या वर्षाचे अध्यक्षपद थेट राष्ट्रवादीला देण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे राष्ट्रवादीने अखेरच्या क्षणी भाजपला साथ देण्याचा निर्णय घेतला. मात्र, आता राष्ट्रवादीला एका वर्षासाठी अध्यक्षपद मिळणार असले तरी येरवडा, वडगाव शेरी प्रभाग समितीचे अध्यक्षपद थेट पाच वर्षांसाठी सोडावे लागणार आहे.

# कृष्णा खोऱ्यातील धरणांतील पाणी ३४%वर

## एलनिनोचा परिणाम, बाष्पीभवन वाढले; पाणी वापरात काटकसर करण्याचे आवाहन

पुणे (दै. संध्या)

कृष्णा खो-याच्या अंतर्गत असलेल्या सर्व धरणांमध्ये कडक उन्हामुळे पाण्याची पातळी खालावू लागली आहे. पाण्याचे बाष्पीभवन वाढल्याने सध्या केवळ 34.07 टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. मागील वर्षी याच दिवसात पाणीसाठा 40टक्के होता. मागील वर्षीच्या तुलनेत यावर्षी सुमारे 6.93 टक्क्यांनी कमी झाला आहे. ही बाब लक्षात घेता पाण्याचे नियोजन करण्याची गरज वाढली आहे. त्यातच यंदा अलनिनोमुळे पाऊसमान कमी होण्याची शक्यता वाढली असून, पिकांसाठी देण्यात येणारे उन्हाळी आवर्तन कमी करण्यावर भर द्यावा लागणार असून, स्थानिक स्वराज्य संस्थांना देखील पिण्याचे पाणी जपून वापरण्याची गरज निर्माण झाली आहे.



राज्याबरोबर कृष्ण खोरे विकास महामंडळांच्या सर्व धरणांच्या पाणीलोट क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर पाऊस पडला. त्यामुळे धरणांच्या पाणीसाठा तुंडुंब होता. पिकांसाठी आवर्तन, स्थानिक स्वराज्य सस्थां,एम. आय.डी.सी., पाणी पुरवठा संस्था ठरवून दिलेल्या पाणी कोट्यापेक्षा जादा पाणी उचलत असल्यामुळे धरणांमधील पाणीसाठा वेळेच्य आधीच कमी होत असल्याचे वास्तव समोर आले आहे. एप्रिल महिन्यातच कृष्णा खो-यामधील पाणीसाठयाची अवस्था अवघ्या 34 टक्क्यांवर आली आहे. अजुन कडक उन्हाचे दोन महिने असून, पाण्याचा वापर असाच वाढत राहिला तर धरणांच्या पाणीसाठा तळ गाठण्याची शक्यता आहे. त्यातच यावर्षी हवामान विभागाने ' अलनिनो'मुळे यंदा पाऊस कमी होण्याची शक्यता वर्तविली आहे. त्यामुळे जलसंपदा विभागाने सर्व स्थानिक संस्थाना पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन केले आहे.

## बाजार समितीत G-56 जागांवर पुन्हा अनधिकृत व्यापार

### प्रशासनावर प्रश्नचिन्ह; कोट्यवधींच्या व्यवहाराचा संशय; कारवाईची मागणी

पुणे (दै. संध्या)

जिल्हा परिषदेने पुरंदर तालुक्यातील खानवडी येथे सुरू केलेल्या सीबीएसई शाळेच्या धर्तीवर आता जिल्ह्यातील सर्व 13 तालुक्यांमध्ये अशा शाळा सुरू करण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. या पार्श्वभूमीवर शाळांसाठी योग्य जागा शोधण्याची मोहीम सुरू करण्यात आली असून, येत्या वर्षभरात ठिकाणे निश्चित करण्याचा मानस आहे, अशी माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.



खानवडी येथील शाळेचे उद्घाटन झाल्यानंतर तीन कंपन्यांनी जिल्हा परिषद प्रशासनाशी संपर्क साधून अशा प्रकारच्या शाळा चालविण्याची तयारी दर्शविली आहे. त्यामुळे प्रत्येक तालुक्यात जागा निश्चित करताना भागीदारीसाठी योग्य संस्था किंवा कंपन्यांची निवड करण्याबाबतही विचारविनिमय करण्यात येणार असल्याचे पाटील यांनी स्पष्ट केले.

खानवडी येथील 'ज्योती सावित्री' शाळेत सध्या बालवाडी ते दुसरीपर्यंतचे वर्ग सुरू आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार शाळेच्या नावातील 'इंटरनॅशनल' शब्द वगळण्यात आला आहे. शाळेला शासनाची मान्यता मिळाली असून, 'यूडीआयएस' क्रमांकासाठी प्रक्रिया सुरू आहे. प्रवेशप्रक्रियेबाबत कोणतीही तक्रार नसल्याचेही प्रशासनाने स्पष्ट केले.

प्रवेशासाठी मार्गदर्शक तत्त्वे (एसओपी) तयार करण्यात आली असून, पुढील शैक्षणिक वर्षापूर्वी ती जाहीर केली जाणार आहेत. खानवडी परिसरातील गरीब कुटुंबांतील विद्यार्थ्यांना प्राधान्य देण्याचा निर्णय कायम ठेवण्यात येणार आहे. यासाठी अगोदर 32 गावांमध्ये सर्वेक्षण करून विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली होती.

सध्या बालवाडीसाठी 120 जागा उपलब्ध असून, गेल्या वर्षी 489 अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी सुमारे 200 विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. आगामी काळात स्थानिक विद्यार्थ्यांना प्राधान्य देत एकही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहणार नाही, याची काळजी घेतली जाईल, असेही पाटील यांनी सांगितले.

## अनधिकृत इंग्रजी शाळांचे रॅकेट; विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ

लोणी काळभोर (दै. संध्या)

हवेली तालुक्यात अनधिकृत इंग्रजी माध्यम शाळांचे मोठे रॅकेटच सुरू असल्याचा धक्कादायक प्रकार समोर येत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अनेक शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची नोंद 'यूडीआयएसई' पोर्टलवर वेगळ्याच शाळांमध्ये दाखवून मोठा गैरप्रकार सुरू असल्याची चर्चा आहे. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी उघडपणे खेळ केला जात असल्याने संताप व्यक्त होत आहे. या गंभीर प्रकरणामुळे शिक्षणव्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

काही ठिकाणी कोणतीही अधिकृत मान्यता नसतानाही शाळा सुरू ठेवून सर्रास फी उकळली जात आहे. शिक्षकांची कमतरता, अपुऱ्या पायाभूत सुविधा आणि केवळ नावालाच शिक्षण देण्याचा प्रकार सुरू असल्याचे चित्र समोर येत आहे. काही शाळांनी आवश्यक अटी पूर्ण न करता बनावट किंवा दिशाभूल करणारी कागदपत्रे सादर करून मान्यता मिळविल्याचे बोलले जात आहे. विद्यार्थ्यांसाठी क्रीडांगण, सुरक्षित इमारत आणि मूलभूत सुविधा नसतानाही या शाळा बेधडकपणे सुरू असल्याचे वास्तव आहे.

काही शाळांमध्ये मान्यता प्रस्ताव अपूर्ण असतानाही वर्षानुवर्षे वर्ग सुरू ठेवले गेले आहेत. विद्यार्थ्यांची नोंद दुसऱ्याच मान्यताप्राप्त शाळेत दाखवून पालकांची फसवणूक होत असल्याचीही चर्चा आहे. अनेक विद्यार्थ्यांना अधिकृत शालेय कागदपत्रे मिळत नसल्याने त्यांचे शैक्षणिक भविष्य धोक्यात आले आहे. याचबरोबर, काही शाळांमध्ये 'यूडीआयएई' पोर्टलवर विद्यार्थ्यांची नावेच नोंदलेली नसल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

## कांद्याचे बाजारभाव घसरल्याने शेतकरी संकटात

नारायणगाव (दै. संध्या)

जुन्नर तालुक्यात सध्या कांदा काढणीचा हंगाम सुरू असताना शेतकऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. वाढती उष्णता,मजुरांची कमतरता,वाढलेले मजुरी दर आणि बाजारपेठेत कांद्याला कवडीमोल बाजारभाव या सर्वांमुळे शेतकरी आर्थिक व मानसिक तणावाखाली आले आहेत. याशिवाय अवकाळी पावसाची शक्यता सांगितली असल्यामुळे त्याची भीती वाटत आहे.

तालुक्यात सर्वत्र कांदा काढणी सुरू असली तरी मजूर उपलब्ध होत नसल्याने कांदा काढणीस अडथळे निर्माण होत आहेत. वाढत्या उन्हामुळे स्थानिक मजूर शेतात काम करण्यास टाळाटाळ करत आहे. परिणामी,शेतकऱ्यांना बाहेरच्या जिल्ह्यातून मजूर बोलवावे लागत आहेत. मजूर मिळवण्यासाठी शेतकऱ्यांना दारोदार फिरावे लागत असून इतर तालुक्यातही जावे लागत आहे. तसेच मजुरीचे दर मोठ्या प्रमाणात वाढल्याने उत्पादन खर्चातही भर पडली आहे. अशा परिस्थितीत कांदा वेळेत काढला गेला नाही,तर पिकाचे मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे, अशी चिंता कांदा उत्पादक शेतकरी यांनी व्यक्त केली. तसेच अवकाळी पावसाची शक्यता सांगितली असल्यामुळे कांदा काढणीची लगबग सुरू झाली आहे. यापूर्वीही अवकाळी पाऊस व गारपीटमुळे काही ठिकाणी असलेल्या कांदा पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते, त्यामुळे शेतकरी चिंतेत आहे.

## १३ तालुक्यांत CBSE शाळा सुरू करण्याचा निर्णय

### खानवडीच्या धर्तीवर विस्तार; ग्रामीण विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्याचा प्रयत्न

पुणे (दै. संध्या)





जिल्हा परिषदेने पुरंदर तालुक्यातील खानवडी येथे सुरू केलेल्या सीबीएसई शाळेच्या धर्तीवर आता जिल्ह्यातील सर्व 13 तालुक्यांमध्ये अशा शाळा सुरू करण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. या पार्श्वभूमीवर शाळांसाठी योग्य जागा शोधण्याची मोहीम सुरू करण्यात आली असून, येत्या वर्षभरात ठिकाणे निश्चित करण्याचा मानस आहे, अशी माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

खानवडी येथील शाळेचे उद्घाटन झाल्यानंतर तीन कंपन्यांनी जिल्हा परिषद प्रशासनाशी संपर्क साधून अशा प्रकारच्या शाळा चालविण्याची तयारी दर्शविली आहे. त्यामुळे प्रत्येक तालुक्यात जागा निश्चित करताना भागीदारीसाठी योग्य संस्था किंवा कंपन्यांची निवड करण्याबाबतही विचारविनिमय करण्यात येणार असल्याचे पाटील यांनी स्पष्ट केले.

खानवडी येथील 'ज्योती सावित्री' शाळेत सध्या बालवाडी ते दुसरीपर्यंतचे वर्ग सुरू आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार शाळेच्या नावातील 'इंटरनॅशनल' शब्द वगळण्यात आला आहे. शाळेला शासनाची मान्यता मिळाली असून, 'यूडीआयएस' क्रमांकासाठी प्रक्रिया सुरू आहे. प्रवेशप्रक्रियेबाबत कोणतीही तक्रार नसल्याचेही प्रशासनाने स्पष्ट केले.

प्रवेशासाठी मार्गदर्शक तत्त्वे (एसओपी) तयार करण्यात आली असून, पुढील शैक्षणिक वर्षापूर्वी ती जाहीर केली जाणार आहेत. खानवडी परिसरातील गरीब कुटुंबांतील विद्यार्थ्यांना प्राधान्य देण्याचा निर्णय कायम ठेवण्यात येणार आहे. यासाठी अगोदर 32 गावांमध्ये सर्वेक्षण करून विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली होती.

सध्या बालवाडीसाठी 120 जागा उपलब्ध असून, गेल्या वर्षी 489 अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी सुमारे 200 विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. आगामी काळात स्थानिक विद्यार्थ्यांना प्राधान्य देत एकही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहणार नाही, याची काळजी घेतली जाईल, असेही पाटील यांनी सांगितले.

# 'नारायणगाव केसरी' किताब सिकंदर शेखचा

## तीन लाखांचे बक्षीस पटकावले; अंतिम लढतीत निरु गुज्जरचा पराभव; हजारो कुस्तीप्रेमींच्या उपस्थितीत रंगला भव्य आखाडा

नारायणगाव (दै. संध्या)

येथील ग्रामदैवत श्री मुक्ताबाई देवी व काळोबा देवस्थानच्या यात्रेनिमित्त आयोजित भव्य कुस्ती आखाड्यात "नारायणगाव केसरी" हा मानाचा किताब महाराष्ट्र केसरी सिकंदर शेख याने पटकावला. अंतिम लढतीत त्याने भारत केसरी निरु गुज्जर याला चितपट करत विजेतेपद मिळवले. या विजयाबद्दल यात्रा समितीच्या वतीने त्याचा तीन लाख रुपयांचे बक्षीस देऊन सत्कार करण्यात आला.



ही रंगतदार कुस्ती निकाली लागताच उपस्थित कुस्ती शौकिनांनी टाळ्यांच्या कडकडाटात सिकंदर शेख यांचे जल्लोषात स्वागत केले. "मुक्ताबाई माते की जय"च्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. या प्रमुख कुस्तीसाठी आमदार शरद सोनवणे यांनी तीन लाख रुपयांचे इनाम जाहीर केले होते. कुस्ती यात्रा समितीचे प्रमुख योगेश पाटे, संतोष खैरे यांच्या हस्ते लावण्यात आली. गुरुवारी सायंकाळी सहा वाजता आखाड्याचे पूजन करून कुस्त्यांना प्रारंभ झाला. रात्री साडेअकरापर्यंत सुमारे १०० कुस्त्या रंगल्या. देवस्थान ट्रस्टच्या वतीने लाल मातीचा आखाडा तयार करून स्टेडियमची उभारणी करण्यात आली होती.

राज्यातील नामांकित पैलवानांनी यात सहभाग घेतला. या आखाड्यात विविध गटांतील कुस्त्यांमध्ये पंचवीस हजार, पंधरा हजार, अकरा हजार रुपयांच्या प्रत्येकी दहा कुस्त्या, तसेच तीन लाख, दीड लाख, एक लाख आणि ५१ हजार रुपयांच्या प्रमुख कुस्त्या पार पडल्या. विजेत्या पैलवानांना एकूण सुमारे १५ लाख रुपयांचे बक्षीस वितरण करण्यात आले. महत्त्वाच्या कुस्त्यांमध्ये सुनील कोटगोंड याने बालाजी खरात याचा पराभव करून १ लाख ५१ हजार रुपयांची कुस्ती जिंकली. सागर देवकाते व शाहरुख खान यांच्यातील एक लाख रुपयांच्या कुस्तीत शाहरुख खान विजयी ठरला. तसेच ओंकार येलभर व अमोल दिंडे यांच्यातील ५१ हजार रुपयांच्या कुस्तीत अमोल दिंडे याने बाजी मारली. या सर्व कुस्त्या २० ते ४० मिनिटे रंगल्या.

या वेळी माजी आमदार अतुल बेनके, आशाताई बुचके,अनिल मेहेर, सुजित खैरे, विश्वस्त प्रकाश पाटे, देवदत्त निकम, गणपत फुलवडे, गुलाबराव नेहरकर, यांच्या हस्ते प्रमुख कुस्त्या लावण्यात आल्या. इनाम वितरणाचे काम दादाभाऊ खैरे, विलास पाटे, राजाराम पाटे, मुरलीधर फुलसुंदर, संजय खैरे यांनी पाहिले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी देवस्थान ट्रस्टचे पदाधिकारी योगेश पाटे, संतोष खैरे, एकनाथ शेटे, अशोक पाटेसंतोष वाजगे आदींनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी माजी आमदार अतुल बेनके आशाताई बुचके अनिल मेहर बाबू पाटे यांची भाषणे झाली. नारायणगावचा प्रसिद्ध कुस्तीचा आखाडा पाहण्यासाठी परिसरातील हजारो कुस्तीप्रेमी उपस्थित होते. नारायणगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण सपांगे यांनी पोलिसांचा चोख बंदोबस्त ठेवला होता. पंच म्हणून अनिल गुंजाळ, अनिल मेहत्रे, एच. पी. नरसुडे यांनी काम पाहिले, तर समालोचन राजेश धायगुडे यांनी केले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### साजापूरला कचरा पेटवल्याने पॅकेजिंग कंपनीसह भंगार साहित्याला लागली आग

साजापूर (दैनिक संध्या) : साजापूर शिवारातील एका मोकळ्या भूखंडावरील कचरा पेटवल्याने लागलेल्या भीषण आगीत पॅकेजिंग कंपनीसह भंगाराचे गोडाऊन जळून खाक झाले. ही घटना सकाळी ११ वाजेच्या सुमारास घडली. वाऱ्यामुळे आग पसरून एस. के. पॅकेजिंग वाळूज एमआयडीसी, मनपा अग्निशमन दल आणि खाजगी टँकरच्या मदतीने तीन तासांनंतर आगीवर नियंत्रण मिळवण्यात आले. नागरी वसाहतीतील अशा अनधिकृत भंगार गोडाऊनची तपासणी करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे. आणि खालीद ट्रेडर्सला विळखा घातला. यात लॅमिनेशन मशीन, कार्टून बॉक्स आणि प्लास्टिक साहित्यासह लाखोंचा माल जळून खाक झाला.




### ठाणे महानगरपालिका कामांच्या अनियमिततेला बसणार चाप

ठाणे (दैनिक संध्या) : नागरिकांना अधिक पारदर्शक, कार्यक्षम, सुरक्षित आणि अपरिवर्तनीय डिजीटल सेवा देण्यासाठी ठाणे महापालिका ब्लॉकचेन तंत्रज्ञानाचा अवलंब करणार आहे. या उपक्रमासाठी सुमारे 48 लाख 97 हजार रुपयांचा खर्च अपेक्षित असून, अर्थसंकल्पात यासाठी निधीची तरतूद नसल्यामुळे आयुक्त सौरभ राव यांच्या मान्यतेने महाराष्ट्र महापालिका अधिनियमाच्या कलम 72 (ब) अंतर्गत आर्थिक दायित्व स्वीकृतीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार राबविण्यात येणाऱ्या 150 दिवसांच्या कृती आराखड्यांतर्गत महापालिकेच्या ई-गव्हर्नन्स व्यवस्थेनुसार हे अत्याधुनिक ब्लॉकचेन तंत्रज्ञान ठाणे महापालिकेत अवलंबण्याचे प्रस्तावित आहे. ब्लॉकचेन तंत्रज्ञानाचा वापर केल्याने महापालिकेच्या विविध नागरी सेवांमध्ये आमूलाग्र बदल होणार आहेत. ब्लॉकचेनवर आधारित डिजिटल जन्म व मृत्यु दाखल्यांमुळे बनावट कागदपत्रांना आळा बसुन पडताळणी प्रक्रिया जलद आणि विश्वासार्ह होईल. सेवा हमी कायद्यांतर्गत मालमत्ता कर कागदपत्रे, विविध प्रमाणपत्रे यांसारख्या सेवा वेळेत आणि सुरक्षितरीत्या उपलब्ध होतील. अग्निशमन, आरोग्य आणि बांधकाम विभागाकडून दिले जाणारे परवाने व ना-हरकत प्रमाणपत्रे डिजिटल स्वरूपात प्रदान करण्यात येतील. या उपक्रमासाठी 48 लाख 97 हजार निधीची गरज आहे. मात्र, माहिती वा तंत्रज्ञान विभागाकडे अर्थसंकल्पीय तरतुद उपलब्ध नसल्याने या निधीच्या आर्थिक दायित्व स्वीकृतीसाठी मनपा आयुक्त सौरभ राव यांच्या मान्यतेने महाराष्ट्र महापालिका अधिनियमातील 72 (ब) अंतर्गत कार्यवाही करण्यासाठी निविदा मागविण्यात येणार आहे. अशी माहिती महापालिका सुत्रांनी दिली. ब्लॉकचेन तंत्रज्ञानामुळे एकदा नोंद झालेली माहिती बदलता येत नाही. शिवाय महापालिकेचा संवेदनशील डेटा सायबर हल्ल्यांपासून सुरक्षित राहणार असून छेडछाड करणे जवळपास अशक्य होईल. तसेच सुरक्षितता, क्रिप्टोग्राफिक हॅश मुळे माहिती अत्यंत सुरक्षित राहुन माहिती व डेटाशी छेडछाड करणे कठीण होते. ब्लॉकचेन हे तंत्रज्ञान एक विकेंद्रित आणि सुरक्षित डिजिटल खातेवही तंत्रज्ञान आहे. यामध्ये माहिती 'ब्लॉक्स' मध्ये साठवली जाते आणि हे ब्लॉक्स साखळी प्रमाणे एकमेकांना जोडलेले असतात.व्यवहार 'ब्लॉक'मध्ये नोंदल्या नंतर नेटवर्कमधील संगणक त्याची पडताळणी करतात. तसेच विकेंद्रीकरण करून माहिती एका सर्व्हरवर न ठेवता अनेक संगणकांवर साठवली जाते.




### तळोजा कारागृहात माहीमच्या कैद्यावर हल्ला; कैदी गंभीर जखमी

पनवेल (दैनिक संध्या) : तळोजा मध्यवर्ती कारागृहात पैशाच्या वादातून झालेल्या हल्ल्यात माहीम येथील न्यायबंदी अल्तमश युसुफ शेख (वय 38) गंभीर जखमी झाला आहे. या प्रकरणी खारघर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून कारागृहाच्या सुरक्षेबाबत पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. तळोजा मध्यवर्ती कारागृहातील सर्कल क्रमांक 3 मधील बॅरेक क्रमांक 8 मध्ये बुधवारी (15 एप्रिल) सकाळी साडेसातच्या सुमारास हा प्रकार घडला. अल्तमश शेख याच्या बरॅकमध्ये असलेल्या मुबीन कादर शेख या कैद्याने अल्तमशवर पैशांसाठी दबाव टाकल्याचे सांगितले जात आहे. अल्तमशने दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपी मुबीन शेखने त्याला 10 हजार रुपये मिळवून देण्यासाठी बहिणीच्या नावाने चिठ्ठी लिहून देण्यास भाग पाडले. बाहेर गेल्यानंतर ही रक्कम 'गुगल पे'च्या माध्यमातून पाठवण्याची व्यवस्था करण्यास सांगितले. मात्र, अल्तमशने तसे करण्यास नकार देताच झगडा उभा राहिला. तो विकोपाला गेला. आरोपी मुबीन शेखने अल्तमशवर जोरदार हल्ला केला. पोटात आणि कानाखाली ठोसे मारत मारहाण केली. अल्तमशचा उजव्या बाजूचा खालचा दात तुटला व त्याच्या तोंडातून मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाला.

### सुवर्णमंदिराच्या धर्तीवर चवदारतळ्याचे जलशुद्धीकरण

महाड (दैनिक संध्या) : महाड येथील ऐतिहासिक चवदार तळ्याचे पाणी शुद्ध करून नागरिकांना पिण्यासाठी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. या प्रकल्पासाठी मंत्री भरत गोगावले यांनी स्वतः अमृतसर येथे जाऊन सुवर्ण मंदिर तलावाच्या जलशुद्धीकरण प्रकल्पाचा अभ्यास केला. महाराष्ट्र राज्याच्या सामाजिक न्याय विभागामार्फत चवदार तळे पाणी शुद्धीकरण प्रकल्प व परिसर सुशोभीकरणासाठी 55.80 कोटींची तरतूद करण्यात आली आहे. या अंतर्गत अमृतसर येथील सुवर्ण मंदिर तलावाचे पाणी ज्या आधुनिक आणि वैज्ञानिक पद्धतीने शुद्ध केले जाते, त्याच धर्तीवर महाडमधील चवदार तळ्याचे पाणी शुद्ध करण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबविण्यात येणार आहे.

# शहरासह उपनगरांचा कारभार महिला उपायुक्तांच्या हाती

## मुंबई महानगरपालिकेत आता प्रशासकीय राजसुद्धा महिलांचे झाले आहे

**मुंबई (दै. संध्या)**

महानगरपालिकेत महापौर, विरोधी पक्षनेत्या, आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, महापालिका सचिव आणि विविध १३ समिती व प्रभाग समिती अध्यक्ष पदावर महिला असतांना आता मुंबई शहर, पुर्व आणि पश्चिम उपनगरांचा महापालिकेचा कारभार तीन महिला उपायुक्तांच्या हाती आला आहे. यामुळे मुंबई महानगरपालिकेत आता प्रशासकीय राजसुद्धा महिलांचे झाले आहे. मुंबई महानगरपालिकेच्या शहर परिमंडळ - १ मध्ये उपायुक्त चंदा जाधव, पश्चिम उपनगरे परिमंडळ ४ विभागात भाग्यश्री कापसे तर पूर्व उपनगरे परिमंडळ - ५ मध्ये उपायुक्त म्हणून संध्या नांदेडकर यांची १५ एप्रिल रोजी नियुक्ती करण्यात आली. अशाप्रकारे मुंबई शहर, पूर्व आणि पश्चिम उपनगरे परिमंडळातील कारभारांवर तीन महिला उपायुक्तांची छाप पडली आहे. मुंबई महापालिकेत २२७ पैकी १३५ सर्वपक्षीय महिला निवडून आल्या आहेत. त्यामुळे मुंबई महापालिकेत ५० टक्क्यांहून अधिक महिला आहेत. मुंबई महापालिकेची महत्त्वाची स्थायी समिती असो वा अन्य समिती त्याठिकाणी अध्यक्ष, सदस्या महिला आहेत. मुंबई महापालिकेच्या सभागृहात महिलांची संख्या अधिक असल्याने सभागृहात महिलांचा बोलबाला आहे. महानगरपालिका प्रशासनात उपायुक्त संवर्गात पदासाठी किमान ७ वर्ष सहाय्यक आयुक्त संवर्गातील पदाचा कार्यकाल




पुर्ण करावा लागतो. यामुळे महानगरपालिकेत उपायुक्त पदाला विशेष दर्जा आणि निर्णय घेण्याची पावरसुद्धा आहे. तसेच पालिका विभाग कार्यालयातील ३ ते ४ सहाय्यक आयुक्त कामकाजावर नियंत्रण व देखरेख ठेवण्याची मोठी भूमिकासुद्धा उपायुक्त यांच्याकडून बजाविली जाते. त्यांच्या कामांचा मोठा व्याप असतो, तसेच त्यांचा थेट संपर्क हा महानगरपालिका आयुक्त, अतिरिक्त आयुक्त आणि महापौर यांच्यांशी असतो. यामुळे पालिका विभाग कार्यालय आणि परिमंडळात या पदावर महत्वाचे स्थान आहे.

परिमंडळ - १ च्या अंतर्गत महापालिकेची वॉर्ड ए, बी, सी, डी आणि ई विभाग कार्यालये येतात.

परिमंडळ ४ मध्ये एम.पुर्व, एम.पश्चिम आणि एल वॉर्ड विभाग कार्यालये आहेत.

तसेच परिमंडळ - ५ मध्ये के.पश्चिम, पी.दक्षिण, पी.उत्तर, पी. पुर्व आदीं

# कुर्ल्याच्या झोपडपट्टीतून न्यायाधीशपदापर्यंत!

## मुंबई महापालिका कर्मचाऱ्याच्या मुलाचे प्रेरणादायी यश

**घाटकोपर (दै. संध्या)**

कुर्ला येथील जरीमरी झोपडपट्टी परिसरात राहणाऱ्या महापालिका कर्मचाऱ्याच्या मुलाने प्रतिकूल परिस्थितीवर मात करत थेट न्यायाधीशपदापर्यंत मजल मारली. शेख अहमद अली यांचे चिरंजीव ॲड. सैफ अहमद अली शेख यांची अलीकडेच न्यायाधीश म्हणून निवड झाली.

शेख अहमद अली हे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दादर येथील पाणी खात्यात कार्यरत आहेत. त्यांची सेवा निवृत्ती जवळ आली असतानाच मुलाने मिळवलेले हे यश त्यांच्या आयुष्यातील अभिमानाचा क्षण ठरले आहे.



जरीमरीसारख्या झोपडपट्टी परिसरातून शिक्षण घेत कठोर परिश्रम आणि जिद्दीच्या जोरावर सैफ शेख यांनी हे यश संपादन केले.

सैफ शेख हे गेली तीन वर्ष अंधेरी कोर्ट तसेच हायकोर्ट येथे वकिली करत आहेत. त्यांनी 2022 साली एलएलबी पूर्ण केले. त्यानंतर पुण्यातील गणेश अकॅडमीमध्ये मार्गदर्शन घेत त्यांनी न्यायाधीशपदाची परीक्षा दिली मात्र, पहिल्याच प्रयत्नात केवळ चार गुणांनी अपयश आले. त्यातून खचून न जाता पुन्हा परीक्षा देत 250 पैकी 156 गुण मिळवून त्यांनी यश मिळवले.

एकूण 40 जागांमध्ये सैफ शेख यांनी 23 वा क्रमांक मिळवत आपले स्थान निश्चित केले. बाप म्हणून आनंद खूप मोठा आहे. तो शब्दात व्यक्त नाही होणार.

# घाऊक बाजारात लाल मिरची तडकली!

**मुंबई (दै. संध्या)**

युद्धजन्य परिस्थितीमुळे भडकलेल्या महागाईला मिरचीने तडका दिला आहे. गतवर्षीच्या तुलनेत यंदा वाळवलेल्या लाल मिरचीचे भाव किलोमागे शंभर ते तीनशे रुपयांनी वाढले आहेत.

कर्नाटक बेडगी, काश्मिरी मिरची 200 ते 300 रुपये किलोमागे महागली असून, आंध्र प्रदेशातील तेजा जातीच्या मिरचीचे दर 100 ते 120 रुपयांनी वाढले आहेत. मुंबईकरांची तेजा, बेडगी आणि काश्मिरी जातीच्या मिरचीला अधिक मागणी आहे. मुंबईत मार्च ते एप्रिल महिन्यात मसाले बनवण्यासाठी लगबगही सुरू झाली असल्याने, मिरचीच्या मागणीत घाऊक बाजारात वाढ झाली आहे. मागणीनुसार पुढे मिरचीचे दर वाढण्याची शक्यता आहे, अशी माहिती घाऊक मिरची व्यापारी अमरीश बारोट यांनी पुढारीशी बोलताना दिली.

उन्हाळा सुरू झाला की अनेक महिला लाल मसाला तयार करण्याच्या तयारीला लागतात. यावर्षी अगदी जानेवारीपासूनच लाल मिरचीचा ठसका वाढला होता. सुक्या मसाल्याच्या लाल मिरच्यांच्या दरात घाऊक बाजारातच यावर्षी मोठी वाढ झाल्याचे दिसून येत आहे.

# सुरक्षेच्या नावाखाली गोदावरी महामंडळाची उधळपट्टी!

**छत्रपती संभाजीनगर (दै. संध्या)**

गोदावरी पाटबंधारे कार्यालयात सुरक्षेच्या नावाखाली लाखो रुपयांची उधळपट्टी सुरू असल्याचा आरोप करण्यात येत असून, शेतकऱ्यांच्या कराच्या पैशातून हा प्रकार होत असल्याची चर्चा आहे. सुरक्षेसाठी नेमण्यात आलेल्या या सुरक्षारक्षकांवर दरमहा लाखोंचा खर्च केला जातो. याउलट पाणी व जमिनीच्या प्रश्नांसाठी येणाऱ्या शेतकऱ्यांनाच या सुरक्षारक्षकांकडून गेटवर रोखले जात असल्याने प्रशासनाविरोधात संताप व्यक्त होत आहे. गोदावरी मराठवाडा पाटबंधारे कार्यालय, कडा ऑफिससह संबंधित सर्व कार्यालयांच्या परिसरात 30 पेक्षा अधिक सुरक्षारक्षक तैनात असून, त्यांच्या पगारावर दरमहा सुमारे 7 लाखांच्या आसपास खर्च होत असल्याचा अंदाज आहे. सुरक्षेच्या नावाखाली उभी केलेली ही यंत्रणा प्रत्यक्षात जनतेलाच दूर ठेवण्यासाठी वापरली जात असल्याचा आरोप होत आहे. विशेषत: याबाबत तक्रारींसाठी संपर्क साधला असता संबंधित अधिकाऱ्यांकडून प्रतिसाद मिळत नसल्याने प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. यापुढे जाऊन सुरक्षा रक्षकांकडून वरिष्ठांच्या सूचनांनुसार नागरिकांना प्रवेश नाकारला जात असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

यामध्ये विशेष म्हणजे, नाव न जाहीर करण्याच्या अटीवर एका सुरक्षारक्षकाने सांगितले की, कोणीही आले तर आधीच काम विचारायचे, पाणी किंवा जमिनीचा प्रश्न असेल तर बाहेरूनच परत पाठवायचे, असे आदेश आहेत. आम्ही फक्त आदेशांचे पालन करतो, नाही तर वरिष्ठांकडून कारवाई होते.

# नांदेड जिल्ह्यात अल्पवयीन मुले गुन्हेगारीच्या जाळ्यात

## खून, चोऱ्या, बनावट नोटाप्रकरणात सक्रिय सहभाग

**नांदेड (दै. संध्या)**

नांदेड जिल्हा हा शिक्षणाचा हब म्हणून ओळखल्या जातो मात्र, ही ओळख पुसली जात असून, शिक्षणाचे हब नाही तर क्राईम कॅपिटल अशी ओळख होत आहे.यामध्ये अल्पवयीन मुलं गुन्हेगारीकडे आकर्षित होत असल्याने ही बाब अत्यंत चिंताजनक आहे. जिल्ह्यातील दोन महिन्यांतील घटनांचा मागोवा घेतला असता अल्पवयीन मुलं खून, चोऱ्या, दुचाकी चोऱ्या, बनावट नोटांच्या प्रकरणात सक्रिय सहभागी असल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले आहेत.

शहरात गेल्या काही दिवसांत झालेला गँगवॉर व पाच हत्याच्या घटनांमुळे नांदेडचे सामाजिक स्वास्थ्य बिघडले ही बाब अधोरेखित होते. मात्र, नांदेड गुन्हेगारांसाठी पोषक का बनलं आहे.याच्यामागची पार्श्वभूमी



लक्षात घेणे आवश्यक आहे. नांदेड मध्ये गुन्हेगारीला मिळालेला सेफ पॅसेज आणि गुन्हेगारी कडे वळलेल्या अल्पवयीनांना ना पालकाचा, ना पोलिसांचा धाक राहिला आहे.

नांदेड मधील 12 ते 17 वयोगटातील अल्पवयीन मुलं गुन्हेगारी क्षेत्रात उतरले आहेत. याची उदाहरणे द्यायची झाली तर, दोन महिन्यांपूर्वी गोवर्धन घाट पुलाजवळ तीन अल्पवयीन मुलांनी पैश्याच्या कारणावरून 16 वर्षाच्या मुलाचा खंजरने भोसकून खून केला. ज्याचा खून झाला तोही चोऱ्यामाऱ्या करणाराच होता. या प्रकरणात वजिराबाद पोलिस ठाण्यात फेब्रुवारी दुसऱ्या आठवड्यात तरोडा खुर्द भागात भाग्यनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत चार ते पाच जणांच्या अल्पवयीन गुन्हेगारांची टोळी पोलिसांनी जेरबंद करून त्यांच्याकडून तब्बल 17 दुचाकी जप्त करण्यात आले.

मार्च महिन्यात सुरुवातीला माहूर तालुक्यातील एका जत्रेत 500 च्या बनावट नोटा चलनात आणण्याचा प्रयत्न करणाऱ्या अल्पवयीन मुलाला ताब्यात घेतले असता त्याचा मास्टरमाइंड दुसरा निघाला मात्र, बनावट नोटा चलनात आणण्यासाठी अल्पवयीन मुलाचा वापर केला गेला. एप्रिल महिन्याच्या सुरुवातीला विमानतळ पोलिस ठाण्याच्या हद्दीत आणखी ऐका अल्पवयीन चोरांच्या टोळीचा पर्दाफाश पोलिसांनी केला.12 ते 17 वयोगटातील चार अल्पवयीन मुलांना पोलिसांनी अटक करुन त्यांच्याकडून 20 दुचाकी जप्त केले.

# वाळू माफियांवर पोलिसांचा प्रहार; धडक कारवाई

## अंदाजे पावणे दोन कोटींचा मुद्देमाल जप्त; दोन बोटी उद्ध्वस्त

**मुंबई (दै. संध्या)**

नायगाव तालुक्यातील इजतगाव परिसरात सुरू असलेल्या अवैध वाळू उपशावर पोलिसांनी अखेर निर्णायक घाव घालत मोठी कारवाई केली. बिलोली उपविभागीय पोलिस अधीक्षक श्याम पानेगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवारी मध्यरात्री छापा टाकत वाळू माफियांच्या ताफ्यावर धडक कारवाई करण्यात आली. या कारवाईत सुमारे पावणे दोन कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आल्याने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे.



माहितीनुसार, गोदावरी नदी पात्रातून अनेक दिवसांपासून रात्रीच्या काळोखात मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू उपसा सुरू होता. विशेष म्हणजे, काही स्थानिक पदाधिकाऱ्यांच्या पुढाकारातून हा व्यवसाय चालत असल्याची चर्चा असून, प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे वाळू माफियांचे जाळे अधिकच बळकट झाले होते. ही बाब गांभीर्याने घेत उपविभागीय अधीक्षक श्याम पानेगावकर यांनी विशेष पथकाची स्थापना करून नियोजनबद्ध कारवाई केली. अचानक टाकलेल्या छाप्यात ट्रॅक्टर, डंपर, टिपर अशी अनेक वाहने ताब्यात घेण्यात आली, तर नदीपात्रातील दोन बोटी बार उडवून नष्ट करण्यात आल्या. कारवाईदरम्यान काही वाहनचालक अंधाराचा फायदा घेत पसार झाले असून, त्यांचा शोध सुरू आहे.

पोलिसांकडून जप्त करण्यात आलेल्या वाहनांवर व संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, या कारवाईमुळे अवैध वाळू व्यवसाय करणाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. परिसरातील नागरिकांनी पोलिसांच्या या धाडसी कारवाईचे स्वागत केले आहे.

दरम्यान, महसूल प्रशासनाच्या मूक संमतीमुळेच हा अवैध धंदा फोफावत असल्याची चर्चा असून, या कारवाईमुळे संबंधित यंत्रणांचीही चांगलीच झोप उडाली आहे. यापूर्वीही विविध अवैध धंद्यांवर कारवाई करून ठसा उमटवणारे पानेगावकर यांनी पुन्हा एकदा कडक भूमिका घेतली आहे.

उपविभागीय अधीक्षक श्याम पानेगावकर यांनी स्पष्ट शब्दांत इशारा देत सांगितले की, "अवैध वाळू उपसा कोणत्याही परिस्थितीत सहन केला जाणार नाही. संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येईल."


कारवाईनंतर इजत गाव परिसरात पोलिसांचा बंदोबस्त वाढवण्यात आला असून, कुंटूर ठाण्याचे सपोनी विशाल भोसले व जाधव, ठाकूर, पल्लेवाड, कदम, मडके, आदी सर्व कर्मचारी या कामी सतर्क झाले आहेत. पुढील काही दिवस विशेष मोहीम राबवली जाणार असल्याचे संकेत पोलिस सूत्राकडून देण्यात आले आहेत. या कारवाईचा परिणाम म्हणून अंतरगावसह गोदावरी काठावरील इतर भागातील वाळू व माती माफियांची धाबे दणाणली असून, अनेक ठिकाणी अवैध उपसा थांबल्याचे चित्र दिसत आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



## वृद्ध महिलेस मारहाण करून सोन्या चांदीचे दागिने केले लंपास

नारायणगाव (दैनिक संध्या) : जुन्नर तालुक्यातील बेल्हे आळकुटी रोडवर असलेल्या गुरुवार (दि. १६) रोजी पहाटे तीन वाजण्याच्या सुमारास चोरट्यांनी एका ८५ वर्षीय वृद्ध महिलेस मारहाण करून अंदाजे 5 हजार रुपये व एक तोळा सोन्याचे दागिने लंपास केले .रानमळा येथे अज्ञात चोरट्यांनी बुधवारी मध्यरात्रीनंतर ते गुरुवारी पहाटेपूर्वी तीन ठिकाणी चोरीचा प्रयत्न केला परंतु; प्रयत्न अयशस्वी झाला. त्यानंतर त्या चोरट्यांनी घरात एकट्याच राहत असलेल्या जिजाबाई गबाजी गुंजाळ (वय ८५) या वृद्ध महिलेच्या घराकडे आले. त्यावेळेस जिजाबाई गुंजाळ या शौचालयासाठी बाहेर गेल्या होत्या. त्याचा फायदा घेत चोरट्यांनी घरात प्रवेश केला. जिजाबाई गुंजाळ या घराकडे आले असता त्यावेळेस चोरट्यांनी त्यांना लोखंडी गजाने डोक्यावर हातावर मारहाण करत जखमी करून कपाटातील ५ हजार रोख रक्कम, चांदीचे दागिने व त्यांच्या गळ्यातील १ तोळे सोन्याचे दागिने लंपास केले. या घटनेनंतर तातडीने जिजाबाई गुंजाळ यांना आळेफाटा येथील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले, त्यांच्या डोक्याला तसेच हाताला जखमा झाल्या असून एकूण २० टाके पडले असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. घटनेची माहिती मिळताच आळेफाटा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक विश्वास जाधव यांनी घटनास्थळी भेट देवून पुढील तपास सुरू केला आहे.




## माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्यावरील 'भारताची प्रतिभा' पुस्तकाचे सोमवारी प्रकाशन

पुणे (दैनिक संध्या) : भारताच्या पहिल्या महिला राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील यांच्या कार्यकर्तृत्वावर आधारित 'भारताची प्रतिभा' या पुस्तकाचे प्रकाशन येत्या सोमवारी (ता. २० एप्रिल) सकाळी ११ वाजता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापिठाच्या संत ज्ञानेश्वर सभागृहात होणार आहे. राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण तथा संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते प्रकाशन सोहळा रंगणार असून, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी व सिम्बायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठाचे संस्थापक पद्मविभूषण डॉ. शां. ब. मुजुमदार यांची विशेष उपस्थिती असणार आहे. यावेळी महिला उद्यम ट्रस्टच्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात येणार आहे. पुस्तक प्रकाशनासह महिलांच्या कर्तृत्वाचा गौरव करणारा हा समारंभ ठरणार आहे. या पुस्तकाची निर्मिती प्रतिभाताई पाटील यांच्या कन्या ज्योती राठोर यांनी केली आहे. संकल्पना ॲड. प्रताप परदेशी, तर संपादन ज्येष्ठ पत्रकार सुरेश उज्जेनवाल यांनी केले आहे. या प्रकाशन समारंभास नागरिक, साहित्यप्रेमी व विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन ग्रामगौरव प्रकाशनाच्या वतीने भाग्यश्री ठाकरे यांनी केले आहे.




## जग्सोमने पहिल्या विशेष ब्रँड मॅनेजमेंट शाळेचा शुभारंभ केला

पुणे (दैनिक संध्या) : जगदीश शेट स्कूल ऑफ मॅनेजमेंटने 'द स्पेशालिस्ट ब्रँड स्कूल' सुरू केली आहे, जी केवळ ब्रँड मॅनेजमेंट शिक्षणावर लक्ष केंद्रित करणारी देशातील पहिली संस्था म्हणून ओळखली जात आहे. संस्थेने ब्रँड मॅनेजमेंटमधील एक वर्षाच्या, पूर्ण-वेळ पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी सप्टेंबर २०२६ सत्राकरिता प्रवेश प्रक्रिया सुरू केली आहे. पहिल्या तुकडीत केवळ ३० जागा असून, निवड प्रक्रिया वैयक्तिक मुलाखती आणि उमेदवारांची दूरदृष्टी, जिज्ञासा व वचनबद्धतेच्या चाचणीवर आधारित असेल. या शाळेचे नेतृत्व ब्रँड स्ट्रॅटेजी तज्ञ प्रा. आनंद नरसिंहा करत आहेत, ज्यांना ४० वर्षांहून अधिक अनुभव असून त्यांनी अनेक आघाडीच्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय ब्रँड्ससोबत काम केले आहे. हा अभ्यासक्रम ब्रँड स्ट्रॅटेजी, ग्राहक वर्तन आणि व्यावहारिक शिक्षणावर लक्ष केंद्रित करतो. यामध्ये तीन महिन्यांच्या ब्रँड प्रॅक्टिकमचा समावेश आहे, जिथे विद्यार्थी वास्तविक उद्योग प्रकल्पांवर काम करतील. जग्सोमचे संस्थापक संजय पाडोदे म्हणाले की, ज्या विद्यार्थ्यांना ब्रँड मॅनेजमेंटमध्ये प्राविण्य मिळवून आपल्या करिअरला नवीन दिशा द्यायची आहे, त्यांच्यासाठी हा उपक्रम एक विशेष संधी आहे.




## सीबीएसई परीक्षेत रिया हाडवळे प्रथम

नारायणगाव (दैनिक संध्या) : मॉडर्न इंग्लिश स्कूल बेल्हे (ता.जुन्नर) इयत्ता १० वी सीबीएसई बोर्डचा शैक्षणीक वर्ष २०२५-२६ चा निकाल १०० टक्के लागला असून सलग ११ वर्ष १०० टक्के निकालाची परंपरा कायम राहिली असल्याची माहिती प्राचार्या विद्या गाडगे यांनी दिली. प्रथम क्रमांक रिया प्रवीण हाडवळे (९२.४० टक्के), द्वितीय भारती समर्थ दत्तात्रय (८९.४०), तृतीय क्रमांक चौरे नीरज जयराम (८७.२०) याने पटकावला आहे. उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सीए सावकार गुंजाळ, अध्यक्ष गोपीनाथ शिंदे, सीईओ शैलेश ढवळे, विश्वस्त दावला कणसे,सर्व संचालक मंडळ, प्राचार्या विद्या गाडगे, उपप्राचार्य के.पी.सिंग, शिक्षक व पालकांनी अभिनंदन केले.

# खेडमध्ये अतिक्रमणांवर प्रशासनाचा 'सर्जिकल स्ट्राईक'

### गायरान जमिनीवरील व्यावसायिक बांधकामांना नोटिसा; पुरावे न दिल्यास थेट जमीनदोस्त कारवाई

राजगुरुनगर (दै. संध्या)

खेड तालुक्यातील सरकारी आणि गायरान जमिनींवर बेकायदेशीर अतिक्रमण करून वैयक्तिक बेसुमार फायदा लाटणाऱ्या भूमाफियांवर महसूल प्रशासनाने हातोडा उगारला आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या जनहित याचिका क्र. १२७/२०२२ च्या कडक आदेशानंतर, प्रांताधिकारी अनिल दौंडे यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार प्रशांत बेडसे आणि पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांच्या नेतृत्वाखाली संयुक्त सर्वेक्षण पूर्ण झाले आहे.

या मोहिमेच्या पहिल्या टप्प्यात व्यावसायिक अतिक्रमणधारकांना तहसीलदार प्रशांत बेडसे यांच्या सहीने निष्कासनाची (कारणे दाखवा) नोटिसा नुकत्याच बजावण्यात आल्या आहेत. येत्या २४ एप्रिलला तारखेला सुनावणी ठेवण्यात आली असून, पुरावे न दिल्यास या मिळकतीवर थेट बुलडोझर फिरवला जाणार आहे. या आक्रमक कारवाईमुळे तालुक्यातील भूमाफियांमध्ये दहशत पसरली आहे. खेड महसूल आणि ग्रामविकास विभागाने गोलेगाव, पिंपळगाव तर्फे चाकण आणि परिसरातील गायरान जमिनींची बारकाईने पाहणी केली. यात निवासी तसेच व्यावसायिक अतिक्रमणे उघडकीस आली. प्रशासनाने पारदर्शक पद्धतीने हे सर्वेक्षण पूर्ण केले असून, कायदेशीर रणनीतीनुसार कारवाईचा रोडमॅप तयार केला आहे.

प्रशासनाने पहिल्या टप्प्यात फक्त व्यावसायिक गाळे, दुकाने आणि शेड्स यांना लक्ष्य केले आहे. कारण सर्वोच्च



न्यायालय, मुंबई उच्च न्यायालय आणि शासनाच्या स्पष्ट आदेशानुसार, सार्वजनिक जमिनीवरील व्यावसायिक अतिक्रमणे कधीही नियमित (Regularize) करता येत नाहीत. निवासी अतिक्रमणांमध्ये काही अपवादात्मक तरतुदी असू शकतात, पण व्यावसायिक बांधकामांना कोणतेही कायदेशीर संरक्षण नाही.

त्यामुळे प्रशासनाने धोरणात्मक निर्णय घेतला आहे की, प्रथम व्यावसायिक अतिक्रमण जमीनदोस्त करावीत. या कारवाईत सुनावणीमध्ये अतिक्रमणधारक कायदेशीर परवानगीचे पुरावे सादर करू शकले नाहीत, तर थेट बुलडोझर कारवाई करण्यात येणार आहे. गेल्या ४ वर्ष (किंवा अधिक) काळातील दंडात्मक भाडे वसूल करण्यात येणार आहे. दंड न भरल्यास सातबारा उताऱ्यावर शासनाचा बोजा लादण्यात येणार आहे. याशिवाय संबंधितांवर थेट पोलिस तक्रार दाखल करण्यात येणार आहे. असे तहसीलदार प्रशांत बेडसे यांनी म्हटले आहे. ही कारवाई केवळ गाळे पाडण्यापुरती मर्यादित राहणार नाही. भूमाफियांना कायमचा धडा शिकवण्यासाठी प्रशासनाने पूर्ण कायदेशीर हत्यारे उपसली आहेत.

प्रांताधिकारी अनिल दौंडे आणि तहसीलदार प्रशांत बेडसे यांनी तयार केलेल्या 'ॲक्शन प्लॅन'मुळे खेड तालुक्यात मोठी चर्चा सुरू झाली आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करताना प्रशासनाने दाखवलेली आक्रमकता आणि पारदर्शकता यामुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे, तर अतिक्रमणधारकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. अशी कारवाई झाल्यास सरकारी जमिनी हडपणाऱ्यांना कोणतीही पळवाट राहणार नाही.

# इंद्रायणी स्वच्छतेसाठी विद्यार्थ्यांचा पुढाकार




आळंदी (दै. संध्या)

इंद्रायणी नदी स्वच्छता अभियानाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग आणि आळंदी नगरपरिषद यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी सकाळी नदीघाट परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. सकाळी ९ ते ११ या वेळेत झालेल्या या उपक्रमात एन.एस.एस. विभागातील विद्यार्थी व स्वयंसेवकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. नदीघाट तसेच नदीपात्रातील कचरा, प्लास्टिक व टाकाऊ वस्तू गोळा करून परिसर स्वच्छ करण्यात आला. या माध्यमातून पर्यावरण संवर्धनासोबत स्वच्छतेबाबत जनजागृतीचा संदेश देण्यात आला. या उपक्रमात मोलाचा सहभाग नोंदवल्याबद्दल महाविद्यालयाच्या एन.एस.एस विभागाचा आळंदी नगरपरिषदेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी श्री संत ज्ञानेश्वर महाराजांचा फोटो तसेच लेखक शरद बाविस्कर लिखित 'भूरा' हे पुस्तक देऊन गौरविण्यात आले. यावेळी नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे आणि मुख्याधिकारी माधव खांडेकर उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी दाखविलेल्या सामाजिक बांधिलकीचे त्यांनी कौतुक करत, अशा उपक्रमांची सातत्याने गरज असल्याचे नमूद केले. उपक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालय व एन.एस. एस विभागाचे नगरपरिषदेच्या वतीने आभार मानण्यात आले.

## जेजुरी नगरपरिषदेच्या वतीने नगराध्यक्ष चषक स्पर्धेला सुरुवात

जेजुरी (दै. संध्या)

जेजुरी नगरपरिषदेच्या वतीने स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या स्मरणार्थ जेजुरीच्या संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मैदानावर नगराध्यक्ष चषक क्रिकेट स्पर्धेला प्रारंभ करण्यात आला आहे.

राज्य शासनाच्या धोरणा नुसार प्रत्येक वर्षी विविध खेळांच्या स्पर्धा घेण्यात याव्यात अशा सूचना देण्यात आल्या असून या सुचणे नुसार जेजुरी नगरपरिषदेच्या वतीने नगराध्यक्ष चषक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेत पुणे जिल्ह्यातील जेजुरी, सासवड, लोणावळा, देहू, बारामती, माळेगाव, इंदापूर व तळेगाव येथील आठ संघ सहभागी झाले आहेत. यात नगरसेवक ,अधिकारी व कर्मचारी खेळाडूंचा समावेश आहे.

या स्पर्धेचे उद्घाटन राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व माजी नगराध्यक्ष दिलीप दादा बारभाई, मुख्याधिकारी चारुदत्त इंगुले, उपनगराध्यक्ष गणेश निकुडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नगरसेवक कृष्णा कुदळे, रोहित खोमणे,शिवाजी जगताप,योगेश जगताप, प्रशांत लाखे, समीर मोरे,नगरसेविका मोनिका घाडगे, मंदा बयास, नीलम सातभाई,स्वरुपा खोमणे, भक्ती कोरपड, प्रज्ञा राऊत, स्नेहल भालेराव माजी नगराध्यक्ष रोहिदास कुंभार श्री खंडोबा पालखी सोहळा, ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष जालिंदर खोमणे आदी उपस्थित होते.

जेजुरी येथील नवीन पालखी मैदानावर ही नगराध्यक्ष चषक स्पर्धा तीन दिवस खेळवले जाणार आहे. क्रिकेट रसिकांनी या स्पर्धेसाठी मोठा प्रतिसाद दिला आहे.

## मीना शाखा कालवा प्रश्नांवर मंत्रालयात ठोस चर्चा; लवकरच निर्णयाची शक्यता

कवठे येमाई (दै. संध्या)

जुन्नर, शिरूर तालुका परिसरातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या मीना शाखा कालव्याच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर आता लवकरच तोडगा निघण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. जलसंपदा विभागाने या प्रश्नांवर सकारात्मक भूमिका घेत कार्यवाहीचे आश्वासन दिल्याने शेतकरी वर्गात आशावाद निर्माण झाला आहे.

घोड व कुकडी प्रकल्प कालवा सल्लागार समितीचे सदस्य तसेच मीना शाखा कालवा अध्यक्ष प्रकाश हनुमंत वायसे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने मंत्रालयात जलसंपदा विभागाचे सचिव डॉ. संजय बेलसरे यांची भेट घेत सविस्तर चर्चा केली.

या बैठकीत मीना शाखा कालव्याशी संबंधित सुमारे २८ पाणी वापर संस्थांना पूर्ण दाबाने पाणी मिळत नसल्याची गंभीर समस्या मांडण्यात आली. कालव्याचे अस्तरीकरण, अनेक ठिकाणी झालेला भराव, टेल डी-वाय लायनिंगची तातडीची गरज आणि १०० हून अधिक गेट्स दुरुस्तीची आवश्यकता याकडेही लक्ष वेधण्यात आले.

तसेच डी.वाय-१ व डी.वाय-२ कालव्यांची वहन क्षमता वाढवणे, गळती रोखणे, अतिक्रमण हटवणे आणि पाणी वापर संस्थांना त्यांच्या कोट्यानुसार पाणी उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली. भूसंपादन व मोबदला प्रलंबित असल्याने शेतकऱ्यांना होत असलेल्या नुकसानीचाही मुद्दा ठळकपणे मांडण्यात आला.

# सुशांत कुटे यांचे ठिय्या आंदोलन स्थगित

शिरूर (दै. संध्या)



शिरूर शहर व ग्रामीण परिसरात वारंवार होणाऱ्या मोठ्या प्रमाणात भारनियमनाच्या निषेधार्थ भूमिपुत्र प्रतिष्ठानच्यावतीने अध्यक्ष सुशांत कुटे यांनी शिरूर महावितरण कार्यालयासमोर शुक्रवार दि.१७ पासून बेमुदत ठिय्या आंदोलन सुरू केले होते या आंदोलनाची दखल घेऊन शिरूर महावितरणचे उपकार्यकारी अभियंता शरद माने यांनी मागण्या मान्य करून लेखी आश्वासन देण्यात आल्यानंतर ठिय्या आंदोलन स्थगित करण्यात आले असल्याचे प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुशांत कुटे यांनी सांगितले.

यावेळी शिरूर नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष रविंद्र ढोबळे, भाजपचे नगरसेवक सागर नरवडे, समता परिषदेचे तालुकाध्यक्ष किरण बनकर, रिपब्लिक पार्टीचे अध्यक्ष निलेश जाधव, माजी नगरसेवक मंगेश खांडरे, युवा सेनेचे शहराध्यक्ष स्वप्नील रेड्डी, शिक्षण मंडळाचे माजी सभापती संतोष शितोळे, बंडू दुधाणे, विनोद साठे, संतोष बोराडे, युवराज दुधाणे आदि उपस्थित होते.

आंदोलनकर्ते कुटे यांना दिलेल्या लेखी आश्वासनात म्हटले आहे की,संपूर्ण शहर व पंचक्रोशी मध्ये ५२८ रोहित्र आहेत व लोडेड असणाऱ्या भागामध्ये नवीन १३ रोहित्र (वीज निरंतर स्कीम) मंजुरीसाठी पाठवण्यात आलेले असून पुढील तीन ते सहा महिन्यामध्ये काम पूर्ण होईल.वरिष्ठ कार्यालयाकडून जास्तीत जास्त मेंटेनचे काम करून घेउन ब्रेकडाउन टाळण्यात येईल.

वीज चोरीवरती आळा घालण्यासाठी भरारी पथक, स्थानिक वीज चोरी पथक यांचा मार्फत वीज चोऱ्या पकडू कंपनी तसेच महावितरण संलग्न कोणीही व्यक्ती यामध्ये असेल तर कंपनी नियमाप्रमाणे योग्य ती कार्यवाही करण्यात येईल असे आंदोलनकर्ते सुशांत कुटे यांना लेखी आश्वासन देण्यात आले आहे.

भार नियमनाच्या निषेधार्थ सुरू केलेले ठिय्या आंदोलन लेखी आश्वासन दिल्यानंतर तात्पुरते स्थगित करत असून पुढील काळात लेखी आश्वासनानुसार मागण्या मान्य न झाल्यास तीव्र आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा यावेळी बोलताना भूमिपुत्र प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुशांत कुटे यांनी दिला.

# लोणी काळभोर येथे पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई

लोणी काळभोर (दै. संध्या)



लोणी काळभोर येथे पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई जाणवत असुन लागोपाठ दोन ते तीन वर्षे झाले उन्हाळ्यात दोन दिवसातून एकदा पाणी येत आहे. गावात दुष्काळ जाणवत आहे. यावर्षी टँकरने युवा उदयोजक नागरिकांना पाणी पुरवठा करीत आहे. हवेली तालुक्यातील पुणे शहराजवळ असलेले व झपाट्याने नागरिकरण झालेले लोणी काळभोर गावात पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई मार्च महिन्या पासूनच जाणवु लागली. त्यासाठी ग्रामपंचायतीने कसलेही नियोजन केले नाही फक्त विहीरीमध्ये पाणी नाही असे सांगितले जाते. वास्तविक पाहता मागील वर्षी सुध्दा पाण्याची कमतरता भासली असुन यावर्षी त्याचा बोध घेऊन कसलेही नियोजन केले गेले नाही. त्यामुळे परिसरात पाण्याचा तुटवडा वाढला असून, दिवसाआड पुरवठा होत आहे. नवीन मुठा कालवा भरून वाहत असुन सुध्दा गावात दुष्काळाचे ढग फिरत आहेत. अशीच परिस्थिती राहिली तर लोणी गाव हे महाराष्ट्रातील दुष्काळी गाव म्हणून ओळखले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. ग्रामपंचायतीची मुदत संपली असुन पदाधिकारी वॉर्डात फिरत नसल्याचे नागरिकांचे म्हणने आहे. मग निवडणूक आली की हेच पदाधिकारी पुन्हा उभे राहण्यासाठी नागरिकांसमोर येणार का ? असा प्रश्न नागरिकांना पडला आहे.

लवकरात लवकर उपाययोजना करून दुष्काळाच्या वाटेकडे निघालेले लोणी काळभोर गाव हे पहिल्या सारखे करावे अशी नागरिकांची इच्छा असल्याचे नागरिकांनी सांगितले . पाणी वाटप करताना सर्वत्र समान पाणी वाटप करावे. गावात सर्वत्र अशी चर्चा सुरू आहे की पाणी सोडणारे कामगार हे कमी जास्त प्रमाणात पाणी पुरवठा करत आहेत. त्यामुळे पंधरा दिवसापूर्वी एक वाद झाला होता. त्यामुळे पाणी सोडणाऱ्यांनी पाणी पुरवठा व्यवस्थित व सर्वत्र समान सोडावे आणि पिण्याचे पाणी जर रस्त्यावर मारले जात असेल तर ग्रामपंचायतीला तसे कळवावे म्हणजे ग्रामपंचायतीला काही तर कडक धोरण तयार करायला लागेल. तसे गावात पाणी सोडले की ते घरासमोर व दुकाना समोरील रस्त्यावर मारले जाते त्यामुळे पिण्याच्या पाण्याची नासाडी होते. यावर ग्रामपंचायतीने कडक उपाययोजना करावी .मतासाठी जर हजारो लिटर पिण्याचे पाणी वाया जात असेल तर ते मत न मिळालेले बरे. लोणी येथील युवा उदयोजक श्रेयस काळभोर यांनी गावातील दुष्काळी परिस्थितीचा अंदाज घेऊन गावात मोफत पिण्याच्या पाण्याचा टँकर चालू केला आहे. त्यामुळे थोडी तरी तहान या पाण्याने भागेल.